पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला
• वर्ष १६ • अंक २१ • सोमवार, दि. २७ जुलै २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८
RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**
धैर्य आणि संयम: हे यशाचे खरे सोबती आहेत, जे कठीण काळात साथ देतात.




## »थोडक्यात

### आंदोलन करणाऱ्यांवर लाठीचार्ज करू शकत नाहीत: न्यायमूर्ती

**नवी दिल्ली :** विद्यार्थी आंदोलना दरम्यान पोलिसांकडून झालेल्या कथित अत्याचारांबाबतच्या याचिकांवर सुनावणी आज झाली. यादरम्यान न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने महत्वाच्या गोष्टी नमूद केल्या. शांततापूर्ण आणि कायद्याच्या चौकटीत राहून आंदोलन करणे हा घटनात्मक अधिकार आहे. केवळ आंदोलन होत आहे म्हणून लाठीचार्जचा अवलंब केला जाऊ शकत नाही, असे त्यांनी यादरम्यान स्पष्ट सांगितले. यादरम्यान न्यायालयाने नमूद केले की, पोलिसांनी बळाचा अतिवापर केला असेल तर त्याची स्वतंत्र चौकशी केली जावी.

---

### दुसऱ्याच दिवशी १०० विद्यार्थ्यांना विषबाधा!

**अमरावती :** मेळघाटातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या अन्नसुरक्षेबाबतचा प्रश्न आता गंभीर वळणावर पोहोचला आहे. धारणी तालुक्यातील बिजूधावडी आणि सावलीखेडा येथील सरकारी आदिवासी आश्रमशाळांतील सुमारे १०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना रविवारी रात्री विषबाधा झाल्याने खळबळ उडाली. विशेष म्हणजे, याच तालुक्यातील टिटंबा आश्रमशाळेत शनिवारी सुमारे ७० विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याच्या घटनेनंतर अवघ्या २४ तासांत हे प्रकार घडले.

---

### मोशी कचरा डेपो दुर्घटना; एका महिन्यात अहवाल द्या!

पिंपरी : मोशी येथील ‘वेस्ट-टू-एनर्जी’ प्रकल्पात कचऱ्याचा प्रचंड ढिगारा कोसळून प्रशासकीय इमारतीवर पडल्याने नऊ जणांचा मृत्यू झाल्याप्रकरणाची गंभीर दखल घेऊन ‘एनजीटी’ने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी), केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (सीपीसीबी) आणि पुणे जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रतिनिधींची संयुक्त समिती स्थापन केली आहे. विशेष म्हणजे, प्रशासकीय इमारत कचरा डेपोच्या इतकी जवळ का उभारली, असा थेट सवाल करीत लवादाने या प्रकरणाची चौकशी करून महिन्यात अहवाल सादर करण्याचा आदेश दिला आहे.


# चार गंभीर गुन्ह्यांतील मुख्य आरोपी गायब!

## महायुती सरकारची प्रतिमा मलिन

## अकोला पोलीसांसमोर मोठे आव्हान कायम

प्रतिनिधी २७ जुलै

**अकोला :** गुटखा माफियांचा वाढता सुळसुळाट, बनावट दारूचे अवैध कारखाने, खाकी वर्दीला लागलेला डाग आणि राजकीय नेत्याचा संशयास्पद मृत्यू—या चार गंभीर प्रकरणांमुळे अकोला जिल्हा पार हादरून गेला आहे. या सर्व घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचे तीन-तेरा झाले असून, महायुती सरकारची प्रतिमा पुरती मलीन झाली आहे. 'हे आरोपी नेमके गायब आहेत की त्यांना वाचवले जात आहे ?' असा संतप्त सवाल आता अकोलेकर विचारत आहेत. राज्यातील महायुती सरकारची प्रतिमा या सर्व प्रकरणात कुठे तरी मलिन होत असल्याची ओरड सत्तापक्षांच्या नेत्यांमध्ये आहे. पालकमंत्र्यांनी या प्रकरणांची गंभीर दखल घेऊन निष्काळजी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी आता जोर धरू लागली आहे.



पवन वडगावे




राज्य उत्पादन शुल्क विभाग अकोला



गौरव शर्मा

### 'दिल्लू'समोर राज्य उत्पादन शुल्क ढीले !

बाळापूरजवळील सातरगाव येथे बनावट दारूचा मोठा कारखाना उघडकीस आला. मात्र, 'दिल्लू' नावाच्या फॅक्टरी मालकासमोर राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पथक अगदी हतबल दिसले. या अवैध धंद्यात जिल्ह्यातील एका बड्या राजकीय नेत्याची गुंतवणूक असल्याचे बोलले जात आहे. हप्त्यांचे गणित आणि मुंबईपर्यंत पोहोचणारे पैसे यामुळेच या प्रकरणावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न सुरू आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे. या प्रकरणात कोण अटक, कोणावर कारवाई याचा खुलासा राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने करण्याची गरज आहे. पण, आज भरारी पथकाचे कार्यालय बंद असल्याने त्या विषयीची माहिती मिळाली नाही.

### अत्याचारी पोलीस शिपाई वडगावे कुठे गेला ?

लग्नाचे आमिष दाखवून छळ केल्याने आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या पीडित तरुणीची कोमात असताना मृत्यूशी दिलेली झुंज अखेर अपयशी ठरली. या घटनेने बाळापुरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. पीडितेला मृत्यूच्या दारात ढकलणारा बाळापूर पोलीस ठाण्याचा शिपाई पवन वडगावे अजूनही फरार आहे. खाकीला डाग लावणाऱ्या या नराधमाला तातडीने बडतर्फ करून गजाआड करण्याची मागणी होत आहे. पवन वडगावे ला शोधण्यासाठी बाळापूर पोलिस कसर तर करत नाही ना याची चौकशी पोलिस अधीक्षकांनी करण्याची गरज आहे.

### गौरव शर्मा गेला कुठे

एमआयडीसीतील दोन गुटखा फॅक्टरींवर एफडीए आणि एल सी बी ने धाड टाकून भंडाफोड केला. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार गौरव शर्मा याचे नाव समोर येऊन १२ दिवस उलटले, तरी अकोला पोलीस त्याला बेड्या ठोकू शकलेले नाहीत. या सर्व प्रकरणात तिसरी फॅक्टरी देखील एम आय डी सी मध्ये असल्याची चर्चा राजकीय, सामाजिक आणि गुन्हेगारी विश्वात आहे. गौरव शर्माच्या मागावर पोलिस असून तो लवकरच गजाआड होईल अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. या सर्व प्रकरणात मकोका लागणार की नाही, याविषयी उत्सुकता आहे.




### शेख मोहसीन यांची अपघात की हत्या ?

**शिवसेना (शिंदे गट) अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष शेख मोहसीन यांचा नेहरू पार्क परिसरात वाहनाच्या धडकेत दुर्दैवी अंत झाला. हा केवळ अपघात नसून चारचाकीने पाठलाग करून चिरडण्याचा नियोजित कट होता, असा गंभीर आरोप त्यांच्या कुटुंबीयांनी केला आहे. खदान पोलिसांसमोर या हत्येच्या गूढाचा उलगडा करण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. या प्रकरणात शिंदे सेनेच्या पदाधिकाऱ्यांवर आरोप लावले जात आहे. अनेक चर्चा या विषयावर होत असून सत्य बाहेर आणण्यासाठी पोलिस काय करतात याकडे सर्वांचे लक्ष आहे. इतकेच नाही तर शेख मोहसीन यांच्या परिवाराने लावलेल्या आरोपांची सत्यता पडताळली जाईल की नाही याची चर्चा रंगली आहे.**

# पेपरफुटी रॅकेट कोणत्या मंत्र्याच्या आशीर्वादाने ?

## हर्षवर्धन सपकाळ यांचा घणाघात

प्रतिनिधी २७ जुलै

मुंबई : देशभरात 'नीट' परीक्षेचा वाद पेटलेला असतानाच, आता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या 'औषध निरीक्षक' भरतीत पेपरफुटी आणि गुणांमध्ये फेरफार झाल्याच्या दाव्याने राज्यात मोठी खळबळ उडवून दिली आहे. उमेदवारांनी या कथित गैरव्यवहाराचे व्हॉट्सअॅप चॅट्स आणि डिजिटल पुरावे आयोगाला सादर करून चौकशीची मागणी केली आहे. या गंभीर प्रकरणावर राष्ट्रवादीचे नेते महेबुब शेख यांच्यानंतर आता कॉंग्रेस नेते हर्षवर्धन सपकाळ यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. पुराव्यांसह तक्रारी समोर येऊनही सरकार शांत का? असा संतप्त सवाल करत सपकाळ यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. हर्षवर्धन सपकाळ यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये, 'पुन्हा एकदा महाराष्ट्रात पेपरफुटीचे आरोप समोर आले असून औषध निरीक्षक भरती परीक्षेची प्रश्नपत्रिका परीक्षा होण्यापूर्वीच व्हॉट्सअॅपवर फिरल्याचे दावे, गुणांतील कथित गैरव्यवहार आणि अधिकृत तक्रारींसह पुरावे समोर आले आहेत. तरीही सरकार आणि संबंधित यंत्रणा शांत का?' असा सवाल उपस्थित केला आहे. लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी त्यांना संरक्षण दिले जात असल्याचा आरोप करत, पेपरफुटीच्या या कथित रॅकेटमागील सूत्रधारांचा शोध घेऊन संपूर्ण प्रकरणाची पारदर्शक चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, या प्रकरणात पेपरफुटी झाल्याची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नसून, तक्रारीतील आरोपांची पडताळणी करून आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

### व्हॉट्स ॲपवर प्रश्न फिरल्याचा दावा

तक्रारीनुसार, २२ मार्च २०२६ रोजी झालेल्या औषध निरीक्षक भरती परीक्षेपूर्वी काही प्रश्न आणि त्यांची उत्तरे व्हॉट्स?पवर व्हायरल झाली होती. काही उमेदवारांना परीक्षेआधीच प्रश्नपत्रिकेची माहिती मिळाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. तसेच काही उमेदवारांच्या गुणांमध्ये आणि अंतिम निवड यादीतही विसंगती असल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर व्हॉट्स ॲप चॅट, कॉल रेकॉर्ड आणि अन्य डिजिटल पुराव्यांची फॉरेन्सिक तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# धर्मेंद्र प्रधानानंतर तीन राज्यांमध्ये शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

प्रतिनिधी २७ जुलै

नवी दिल्ली : नीट पेपर लीक प्रकरणावरून दिल्लीच्या जंतर-मंतर येथे कॉकरोच जनता पार्टी आणि विद्यार्थ्यांनी पुकारलेल्या तीव्र आंदोलनानंतर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.

त्यांच्या राजीनाम्याने राजकीय वर्तुळात पेटलेली ठिणगी आता शांत होण्याऐवजी तिचा वणवा इतर राज्यांत पसरला आहे. दिल्लीतील या घडामोडींनंतर आता आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि पंजाब या तीन प्रमुख राज्यांतील शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरू लागली आहे.

वायएसआर कॉंग्रेस पक्षाचे प्रमुख जगन मोहन रेड्डी यांनी जिल्हा निवड समिती भरती परीक्षेत झालेल्या कथित गैरप्रकारांवरून आंध्र प्रदेशचे शिक्षण मंत्री नारा लोकेश यांच्या राजीनाम्याची थेट मागणी केली आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पोस्ट करत जगन मोहन रेड्डी म्हणाले, 'धर्मेंद्र



प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला आणि राजकीय उत्तरदायित्वाचा एक वस्तुपाठ मांडला.

मग सुमारे ३.५ लाख उमेदवारांच्या भविष्याशी खेळणाऱ्या डीएससी परीक्षेशी संबंधित अनियमिततेची जबाबदारी घेऊन नारा लोकेश राजीनामा देणार की मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू मुलाचा बचाव करणार?,' असा सवाल त्यांनी उपस्थित केलाय. यावर प्रत्युत्तर देताना नारा लोकेश यांनी म्हटले की, 'जे लोक आज नैतिकतेचे धडे देत आहेत, त्यांचा स्वतःचा भूतकाळातील रेकॉर्ड काय सांगतो हे जनतेला चांगले ठाऊक आहे.

तेलंगणात भाजप प्रदेशाध्यक्ष एन. रामचंदर राव यांनी मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्याकडे शिक्षण खात्याच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. ट्यूशन फी री-इम्बर्समेंट योजनेचे प्रलंबित १२,००० कोटी रुपये राज्य सरकार देऊ शकत नसेल, तर शिक्षण मंत्रालय रेवंत रेड्डी यांनी स्वतःकडे ठेवू नये, असा घणाघात त्यांनी केला. सुमारे २० लाख विद्यार्थ्यांशी संबंधित असणारा हा निधी त्वरित वर्ग न केल्यास कॉंग्रेस सरकारला तीव्र जनआक्रोशाचा सामना करावा लागेल, असा इशाराही भाजपने दिला आहे.

पंजाबमध्ये भाजप नेते मनजिंदर सिंह सिरसा यांनी कथित 'फार्मसी' परीक्षा पेपर लीक प्रकरणी आम आदमी पक्षाच्या शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. लाखो रुपयांच्या देवाणघेवाणीतून हा पेपर लीक झाला असून यामुळे ७,००० हून अधिक विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लागल्याचा आरोप त्यांनी केला. जंतर-मंतरवरील आंदोलनात मनीष सिसोदिया यांनी 'आपच्या राज्यात पेपर लीक झाला तर मंत्र्याला हटवू,' असे वक्तव्य केले होते, याची आठवण करून देत सिरसा यांनी 'आप'च्या दुटप्पी धोरणावर सडकून टीका केली आहे.

### एमपीएससी पेपरफुटीप्रकरण: रोहित पवारांचा गौप्यस्फोट!

**मुंबई :** 'एमपीएससी'च्या औषध निरीक्षक भरती परीक्षेत नंदुरबार येथील 'कौटिल्य अकॅडमी'ने २० मार्च रोजीच व्हॉट्स ॲपवर पेपर फोडल्याचा थेट आरोप आमदार रोहित पवार यांनी मुंबईतील पत्रकार परिषदेत केला आहे. नायब तहसीलदाराच्या मुला-मुलीचे रँकिंग, कमी गुण असणाऱ्यांना मुलाखतीचे कॉल आणि बार्शी कनेक्शनचे खळबळजनक पुरावे मांडत रोहित पवार यांनी या प्रकरणाच्या फॉरेंसिक ऑडिटसह थेट सीबीआय चौकशीची आणि दोषींवर एफआयआर दाखल करण्याची मागणी केली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे २२ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'औषध निरीक्षक' भरती परीक्षेत मोठा गैरव्यवहार आणि पेपर फुटल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. पुराव्यांसह या प्रकरणाचा पर्दाफाश करत थेट एका अकॅडमीने हा पेपर फोडल्याचा खळबळजनक दावा केला.

# देवेंद्र फडणवीस यांनी कोठे राहावे, हे त्यांच्या हातात नाही - खा. संजय राऊत

## पुढचे केंद्रीय शिक्षणमंत्री फडणवीसच

प्रतिनिधी २७ जुलै

मुंबई : देवेंद्र फडणवीस हे मी महाराष्ट्रातच राहणार, असे सांगत असले तरी त्यांनी कुठे राहायचं, ही गोष्ट त्यांच्या हातात नाही. २०२२ मध्ये उपमुख्यमंत्री पद स्वीकारणं त्यांच्या हातात नव्हतं ना? जेव्हा कमिशनरचा हवालदार केला, तेव्हा मोदी-शाहांनी आदेश दिले होते. या गोष्टी त्यांच्या हातातच नाहीत. भारतीय जनता पक्षात स्वाभिमान आणि मेरिट आहे कुठे? या देशाचा शिक्षणमंत्री मेरिटवर करायचा असेल तर मोदींच्या मनात या क्षणी देवेंद्र फडणवीस यांचेच नाव सुरु आहे, असे संजय राऊत यांनी म्हटले. ज्याप्रमाणे १९९१ मध्ये तत्कालीन पंतप्रधान नरसिंह राव यांनी अर्थखात्याची धुरा मनमोहन सिंग यांच्याकडे देऊन आर्थिक क्रांती घडवून आणली त्याप्रमाणे पंतप्रधान मोदी देशातील शिक्षणपद्धती सुधारण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या बाहेरची व्यक्ती या पदावर बसवावी. नंदन निलकेणीयांना शिक्षणमंत्री पद द्यावे. गेलाबाजार ज्या देवेंद्र फडणवीस यांचा विचार करताच आहात, ते फडणवीस योग्य व्यक्ती आहेत. त्यांनाच देशाचं शिक्षणमंत्री केलं जाईल, हे मी ठामपणे सांगतो, ते कितीही नाही म्हणाले तरी, तेच पुढचे शिक्षणमंत्री आहेत, असे संजय राऊत यांनी म्हटले. ते सोमवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.



### दहा वर्षात शिक्षण पद्धतीचं वाटोळं केलं!

गेल्या दहा वर्षात देशात बोगस शिक्षणपद्धती संघाच्या माध्यमातून निर्माण झाली आहे. पंडित नेहरुंच्या काळापासून आपली शिक्षणपद्धती आधुनिक होती. त्याचं वाटोळं गेल्या दहा वर्षात झालं. नेहरु, इंदिरा गांधी, राजीव गांधी, मनमोहन सिंह हे आधुनिक विचारसरणीचे लोक होते. ही आधुनिकता मारुन तुम्ही भारताला पुराणकालीन आणि महाभारत काळातील शिक्षणपद्धतीत नेलं, याबद्दल भाजपने माफी मागितली पाहिजे. देश आधुनिकीकरणाच्या मार्गाने जावा, नव्या पिढीने हे आत्मसात करावं, त्यासाठी या देशात आयआयटी, आयआयएम या संस्थांची स्थापना झाली.


# भाषिक उल्लेखांमुळे आदिवासी ओळख बदलत नाही!

## नागपूर खंडपीठाचा निर्णय, अकोल्याच्या सक्षम पट्टीचा 'मन्नेवार' अ.ज.दावा मंजूर

प्रतिनिधी २७ जुलै

**नागपूर :** केवळ भाषिक उल्लेखांमुळे आदिवासी ओळख बदलत नाही, असे निरक्षण नोंदवत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. 'तेलगू मन्नेवार' किंवा 'हिंदू मन्नेवार' केवळ भाषिक आणि प्रादेशिक संज्ञा आहे. ती वेगळी जात नाही, असेही नागपूर खंडपीठाने म्हटलं आहे. अकोल्यातील १७ वर्षीय सक्षम पट्टीचा 'मन्नेवार' अनुसूचित जमातीचा दावा मंजूर करत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

दरम्यान, अमरावती जात पडताळणी समितीने सक्षमचा दावा यापूर्वी फेटाळला होता. यावर सक्षम पट्टीचा न्यायालयात धाव घेत याचिका दाखल केली असता समितीचा आदेश रद्द करत ६ आठवड्यांत वैधता प्रमाणपत्र देण्याचे निर्देश नागपूर खंडपीठाने दिले आहे. तर 'तेलगू मन्नेवार', 'हिंदू मन्नेवार', 'मन्नेवार' आणि 'तेलगू' उल्लेखावरून होणारा समितीचा दावा फेटाळला होता. परिणामी, उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने समितीचा निष्कर्ष कायद्याच्या दृष्टीने चुकीचा आणि पूर्वग्रहदूषित असल्याचे म त



### तेलगू मन्नेवार, हिंदू मन्नेवार केवळ भाषिक अन् प्रादेशिक संज्ञा

'मन्नेवार'पूर्वी जोडलेले 'तेलगू', 'तेलंगी', 'हिंदू' भाषा, प्रदेश किंवा धर्म दर्शवणारे शब्द आहेत. त्यामुळे भाषा, प्रदेश किंवा धर्मामुळे मूळ आदिवासी जात बदलत नसल्याचे मत नागपुर खंडपीठाने नोंदवलं आहे. 'तेलगू मन्नेवार', 'तेलंगी' आणि 'मन्नेवार' एकाच अनुसूचित जमातीचे असल्याचं नागपुर खंडपीठाचे म्हणणं आहे.

नोंदवत हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. १९२४ च्या खापर पणजोबांच्या जन्मदाखल्यात 'मन्नेवार' जातीची नोंद न्यायालयाने ही बाब ग्राह्य धरली. १९६७ मधील आजोबांच्या सर्व्हिस बुकातील 'मन्नेवार तेलगू' नोंदीलाही न्यायालयाने मान्यता दिली आहे. तर जुने शासकीय दस्तावेज ठोस पुरावा समितीनेही त्यावर संशय व्यक्त केला होता. अशातच 'मन्नेवार' अनुसूचित जमातीचा दावा मंजूर करत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महत्त्वपूर्ण निर्णय दिलाय.




## पाऊस गाणी

पावसावर आधारित प्रसिद्ध मराठी गाण्यांमध्ये 'ये रे ये रे पावसा', 'नाच रे मोरा' आणि 'ऋतू हिरवा, ऋतू बरवा' ही लोकप्रिय गीते समाविष्ट आहेत. ही गाणी लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण आवडीने ऐकतात.बालगीते आणि पारंपरिक गाणीये रे ये रे पावसा: लहान मुलांचे अतिशय आवडते आणि पाऊस पडताना सर्वात पहिलेम्हटले जाणारे प्रसिद्ध बालगीत.नाच रे मोरा: कवी शांता शेळके यांचे हे गाणे पावसाळ्यात नाचणाऱ्या मोरावर आधारित आहे.ए आई मला पावसात जाऊ दे: पावसाच्या आनंदात भिजण्याची इच्छा व्यक्त करणारे गोड बालगीत.भावगीते आणि संस्मरणीय गाणीऋतू हिरवा, ऋतू बरवा: निसर्गाचे सौंदर्य आणि पावसाळ्याचे रूपवर्णन करणारी सुंदर कविता व गाणे.पाऊस कधीचा पडतो: पावसाच्या रिमझिम थेंबांसोबत मनातली भावना व्यक्त करणारे सदाबहार गाणे.

# एपीजे यांचा शास्त्रज्ञ ते राष्ट्रपती थक्क करणारा प्रवास!

अवुल पाकीर जैनुलाब्दिन तथा ए.पी.जे अब्दुल कलाम यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९३१ मध्ये रामेश्वरम मद्रास येथे झाला. तर मृत्यू २७ जुलै २०१५ मध्ये शिलाँग मेघालय येथे झाला. ते एक भारतीय एरोस्पेस शास्त्रज्ञ होते. तसेच त्यांनी २००२ ते २००७ या काळात त्यांनी भारताचे ११वे राष्ट्रपती म्हणून देखील काम केले होते. कलाम हे तामिळनाडूच्या रामेश्वरम येथे वाढले होते, आणि तेथेच त्यांनी भौतिकशास्त्र आणि एरोस्पेस अभियांत्रिकीचा अभ्यास केला. त्यांनी पुढील चार दशके शास्त्रज्ञ आणि विज्ञान प्रशासक म्हणून, प्रामुख्याने संरक्षण संशोधन आणि विकास संस्था आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था येथे काम केले. भारताच्या नागरी अंतराळ कार्यक्रमात आणि लष्करी क्षेपणास्त्र विकासाच्या प्रयत्नांमध्ये त्यांचा खूप मोठा सहभाग होता. अशा प्रकारे बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आणि प्रक्षेपण वाहन तंत्रज्ञानाच्या विकासावर केलेल्या कामामुळे ते भारताचे मिसाइल मॅन म्हणून ओळखले जाऊ लागले. १९९८ मध्ये भारताच्या पोखरण-२अणुचाचण्यांमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण संघटनात्मक, तांत्रिक आणि राजकीय भूमिका बजावली. १९७४ मध्ये भारताने केलेल्या मूळ अणुचाचणीनंतर ही पहिलीच चाचणी होती.

## ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा आज स्मृतिदिन



कलाम यांची २००२मध्ये सत्ताधारी भारतीय जनता पक्ष आणि तत्कालीन विरोधी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या पाठिंब्याने भारताचे ११ वे राष्ट्रपती म्हणून निवड झाली. त्यांना 'पीपल्स प्रेसिडेंट' म्हणून व्यापकपणे संबोधले जाते. राष्ट्रपतीपदानंतर कलाम हे शिक्षण, लेखन आणि सार्वजनिक सेवेच्या नागरी जीवनात परतले. भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान असलेल्या भारतरत्नसह अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांचे ते प्राप्तकर्ते होते.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट शिलाँग येथे व्याख्यान देत असताना कलाम कोसळले आणि २७ जुलै २०१५ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने वयाच्या ८३व्या वर्षी त्यांचे निधन झाले. राष्ट्रीय स्तरावरील मान्यवरांसह हजारो लोक त्यांच्या गावी रामेश्वरम येथे आयोजित अंत्यसंस्कार समारंभास उपस्थित होते, जिथे त्यांना पूर्ण राज्य सन्मानाने दफन करण्यात आले.

अवुल पाकीर जैनुलाब्दीन अब्दुल कलाम यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९३१ रोजी पंबन बेटावरील रामेश्वरमच्या तीर्थक्षेत्रात (तेव्हाच्या मद्रास प्रांतात आणि आजच्या तामिळनाडू राज्यात) एका तमिळ मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे वडील जैनुलाब्दीन मारकायर हे बोटीचे मालक आणि स्थानिक मशिदीचे इमाम होते, तर त्यांच्या आई आशिअम्मा गृहिणी होत्या. त्यांचे वडील बोटीतून हिंदू यात्रेकरूंना रामेश्वरम आणि आता निर्जन झालेल्या धनुषकोडी दरम्यान घेऊन जात होते. कलाम हे त्यांच्या कुटुंबातील चार भाऊ आणि एका बहिणीमध्ये सर्वात लहान होते. श्वार्ट्झ हायर सेकंडरी स्कूल, रामनाथपुरम येथे शिक्षण पूर्ण केल्यानंतर कलाम यांनी सेंट जोसेफ कॉलेज, तिरुचिरापल्ली येथे प्रवेश घेतला. हे महाविद्यालय तेव्हा मद्रास विद्यापीठाशी संलग्न होते. तेथून त्यांनी १९५४ मध्ये भौतिकशास्त्रात पदवी प्राप्त केली. मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये एरोस्पेस अभियांत्रिकीचा अभ्यास करण्यासाठी ते १९५५ मध्ये मद्रासला गेले. कलाम एका वरिष्ठ वर्गाच्या प्रकल्पावर काम करत असताना, डीन त्यांच्या प्रगतीच्या अभावामुळे असमाधानी होते आणि पुढील तीन दिवसांत प्रकल्प पूर्ण न झाल्यास त्यांची शिष्यवृत्ती रद्द करण्याची धमकी दिली. कलाम यांनी अंतिम मुदत पूर्ण करून डीनला प्रभावित केले. फायटर पायलट होण्याचे त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यात ते थोडक्यात चुकले, कारण ते पात्रता फेरीत नवव्या स्थानावर होते आणि आयएएफमध्ये फक्त आठ जागा उपलब्ध होत्या.

१९६० मध्ये मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधून पदवी घेतल्यानंतर कलाम हे संरक्षण संशोधन आणि विकास सेवाचे सदस्य बनले आणि त्यानंतर संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेच्या (प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरो, भारत सरकारद्वारे) एरोनॉटिकल डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंटमध्ये शास्त्रज्ञ म्हणून सामील झाले. त्यांनी एक लहान हॉवरक्राफ्ट डिझाईन करून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली, परंतु डीआरडीओमध्ये नोकरीच्या निवडीबद्दल त्यांना खात्री पटली नाही. कलाम हे प्रसिद्ध अंतराळ शास्त्रज्ञ विक्रम साराभाई यांच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या इस्कोपर समितीचा देखील भाग होते.

१९६९ मध्ये कलाम यांची भारतीय अंतराळ संशोधन संस्थामध्ये बदली करण्यात आली जिथे ते भारताचे पहिले उपग्रह प्रक्षेपण वाहनचे प्रकल्प संचालक होते, ज्याने जुलै १९८० मध्ये रोहिणी उपग्रह पृथ्वीच्या जवळच्या कक्षेत यशस्वीरित्या तैनात केला होता; कलाम यांनी पहिल्यांदा १९६५ मध्ये डीआरडीओ येथे स्वतंत्रपणे विस्तारित रॉकेट प्रकल्पावर काम सुरू केले होते. १९६९ मध्ये कलाम यांना सरकारची मान्यता मिळाली आणि त्यांनी अधिक अभियंते समाविष्ट करण्यासाठी कार्यक्रमाचा विस्तार केला. १९६३ ते १९६४ मध्ये कलामांनी नासाच्या व्हर्जिनियामधील हॅम्प्टन येथील लँगली संशोधन केंद्र, ग्रीनबेल्ट, मेरीलँडमधील गोडार्ड स्पेस फ्लाइट सेंटर; आणि वॉलॉप्स फ्लाइट सुविधा या केंद्रांना भेटी दिल्या. १९७० आणि १९९० च्या दरम्यान कलाम यांनी पोलर सॅटेलाइट लॉन्च व्हेईकल आणि एसएलव्ही ३ प्रकल्प विकसित करण्याचा प्रयत्न केला, जे दोन्ही यशस्वी ठरले. कलाम यांना राजा रामण्णा यांनी टीबीआरएलचे प्रतिनिधी म्हणून स्माइलिंग बुद्धा या देशातील पहिल्या अणुचाचणीचे साक्षीदार होण्यासाठी, जरी त्यांनी त्याच्या विकासात भाग घेतला नसला तरी, आमंत्रित केले होते.

### राष्ट्रपती म्हणून कारकीर्द

अब्दुल कलाम यांनी के.आर. नारायणन यांच्यानंतर भारताचे ११वे राष्ट्रपती म्हणून काम केले. लक्ष्मी सहगल यांनी जिंकलेल्या १०७,३६६ मतांना मागे टाकून त्यांनी २००२ ची राष्ट्रपती निवडणूक ९२२,८८४ मतांनी जिंकली. त्यांचा कार्यकाळ २५ जुलै २००२ ते २५ जुलै २००७ असा होता. १० जून २००२ रोजी त्यावेळी सत्तेत असलेल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) राष्ट्रपती पदासाठी कलाम यांना नामनिर्देशित केले

१९७० च्या दशकात कलाम यांनी प्रोजेक्ट डेव्हिल आणि प्रोजेक्ट व्हॅलिअंट या दोन प्रकल्पांचेही दिग्दर्शन केले, ज्यात यशस्वी एथ्न्र प्रोग्रामच्या तंत्रज्ञानातून बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे विकसित करण्याचा प्रयत्न केला होता. केंद्रीय मंत्रिमंडळाची नापसंती असूनही, पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी कलाम यांच्या संचालकपदाखाली त्यांच्या विवेकाधिकारांद्वारे या एरोस्पेस प्रकल्पांसाठी गुप्त निधी वाटप केला. कलाम यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाला या वर्गीकृत एरोस्पेस प्रकल्पांचे खरे स्वरूप लपविण्यास पटवून देण्याची अविभाज्य भूमिका बजावली. त्यांच्या संशोधन आणि शैक्षणिक नेतृत्वामुळे त्यांना १९८० च्या दशकात मोठी प्रतिष्ठा आणि प्रतिष्ठा मिळाली, ज्यामुळे सरकारला त्यांच्या संचालकपदाखाली प्रगत क्षेपणास्त्र कार्यक्रम सुरू करण्यास प्रवृत्त केले.

कलाम आणि संरक्षण मंत्र्यांचे धातुशास्त्रज्ञ आणि वैज्ञानिक सल्लागार डॉ. व्ही.एस. अरुणाचलम यांनी तत्कालीन संरक्षण मंत्री आर. वेंकटरामन यांनी एकापाठोपाठ एक नियोजित क्षेपणास्त्रे घेण्याऐवजी एकाचवेळी क्षेपणास्त्रांचा थरकाप विकसित करण्याच्या प्रस्तावावर काम केले. इंटिग्रेटेड गाईडेड मिसाईल डेव्हलपमेंट प्रोग्राम नावाच्या मिशनसाठी ३.८८ अब्ज वाटप करण्यासाठी मंत्रिमंडळाची मंजूरी मिळवण्यात आर वेंकटरामन यांचा मोलाचा वाटा होता आणि कलाम यांची मुख्य कार्यकारी म्हणून नियुक्ती केली. कलाम यांनी मिशन अंतर्गत अनेक क्षेपणास्त्रे विकसित करण्यात प्रमुख भूमिका बजावली, ज्यात अग्नी, एक मध्यवर्ती श्रेणीचे बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आणि पृथ्वी, पृष्ठभागावरून पृष्ठभागावर मारा करणारे सामरिक क्षेपणास्त्र यांचा समावेश होतो. परंतु या प्रकल्पांवर गैरव्यवस्थापन आणि खर्च तसेच वेळ वाढल्याबद्दल टीका झाली आहे. कलाम यांनी जुलै १९९२ ते डिसेंबर १९९९ या कालावधीत पंतप्रधानांचे मुख्य वैज्ञानिक सल्लागार आणि संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे सचिव म्हणून काम केले. १९९८ मध्ये, हृदयरोगतज्ज्ञ सोमा राजू यांच्यासमवेत कलाम यांनी 'कलाम-राजू स्टेंट' नावाचा कमी किमतीचा कोरोनरी स्टेंट विकसित केला. २०१२ मध्ये या जोडीने ग्रामीण भागातील आरोग्य सेवेसाठी एक खडबडीत टॅबलेट संगणक तयार केला, ज्याला 'कलाम-राजू टॅब्लेट' असे नाव देण्यात आले.

## पुनर्मूल्यांकन व इतर शैक्षणिक बाबींसाठी 'मुक्त' विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांची होणारी लूट थांबवा

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामध्ये पुनर्मूल्यांकनात विद्यार्थ्यांकडून अवाजवी शुल्क आकारण्यात येत असल्याने दिसून येत आहे. ही लूट थांबवावी अशी विनंती प्रा.डॉ.संजय त्रिंबकराव खडक्कार, माजी विद्वत परिषद सदस्य, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे केली आहे.

परीक्षेत जर एखाद्या विद्यार्थ्याला त्याच्या मिळालेल्या गुणाविषयी किंवा निकालाबाबत शंका असल्यास किंवा तो असमाधान असेल, तर तो आपली उत्तरपत्रिका पुन्हा तपासण्यासाठी विद्यापीठाकडे अर्ज करू शकतो. आता या पुनर्मूल्यांकनासाठी पण मुक्त विद्यापीठ भरमसाठ शुल्क आकारते. विद्यार्थ्यांना पुनर्मूल्यांकन करण्यासाठी पहिले उत्तरपत्रिकेची छायाप्रत (फोटो कॉपी) मागावी लागते व त्यासाठी प्रति उत्तरपत्रिका ३०० रुपये भरावे लागतात. नंतर पुनर्मूल्यांकन करण्यासाठी प्रति उत्तरपत्रिका ५०० रुपये घेण्यात येतात. असे पुनर्मूल्यांकनासाठी एकूण प्रति उत्तरपत्रिका ८०० रुपये खर्च येतो.

मुक्त विद्यापीठ उत्तर पत्रिकेचे मूल्यांकन हे ऑनलाईन पद्धतीने करते. मुक्त विद्यापीठ विद्यार्थ्यांनी सोडविलेल्या सर्व उत्तरपत्रिका स्कॅन करून ऑनलाइन पद्धतीने केंद्रीय मूल्यमापन केंद्राकडे (कॅप) पाठवितात. परीक्षेनुसार, परीक्षकाला प्रति उत्तरपत्रिका तपासण्याचे १० रुपयांपासून जास्तीत जास्त ५० रुपये दिले जातात.

पुनर्मूल्यांकनासाठीची उत्तरपत्रिका ही मुल्यांकनासाठी पहिलेच स्कॅन केली असते व त्यासाठीचे परीक्षा शुल्क पण पहिलेच घेतले असते. मग पुनर्मूल्यांकनासाठी परत स्कॅनचा खर्च व स्कॅन केलेली उत्तरपत्रिका कॅप मुल्यांकन केंद्रावर (कॅप) ऑनलाइन पाठवण्याचा खर्च जवळपास नसतोच. त्यामुळे जास्तीत जास्त प्रति उत्तरपत्रिका ५० ते ६० रुपये खर्च पुनर्मूल्यांकनासाठी विद्यापीठाला लागतो. पण मुक्त विद्यापीठ विद्यार्थ्यांकडून प्रति उत्तरपत्रिका ८०० रुपये घेते. हे निश्चितच अवास्तव असून या माध्यमातून पण विद्यार्थ्यांची लूट करणे अनुचित आहे.

एकतर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना प्रामुख्याने समाजातील ज्या घटकांना वेळेअभावी किंवा इतर कारणांमुळे नियमित महाविद्यालयात जाऊन शिक्षण घेणे शक्य झाले नाही उदा. नोकरदार, गृहिणी, शेतकरी, कामगार आणि दुर्बल घटक इत्यादी त्यांच्यापर्यंत उच्च शिक्षण पोहोचवण्यासाठी करण्यात आली. असे विद्यार्थी उच्च शिक्षणाच्या प्रवाहात यावेत या दृष्टीने हे विद्यापीठ स्थापन करण्यात आले, आणि मुक्त विद्यापीठ ही काही नफा कमविण्यासाठी उघडलेली शैक्षणिक संस्था नाही.त्यामुळे विद्यार्थ्यांकडून अवाजवी शुल्क आकारणे अशोभनिय आहे. येथे प्रामुख्याने नमूद करावेसे वाटते की मुक्त विद्यापीठ हे महाराष्ट्रातील सर्व सार्वजनिक विद्यापीठांमध्ये सर्वात श्रीमंत असे विद्यापीठ आहे ज्याच्या गंगाजळीत १००० कोटी रुपयांहून जास्त रक्कम जमा आहे.

मागील दोन वर्षांपूर्वी मुक्त विद्यापीठाने सरासरीने अशा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क हे जवळपास दुपटीने वाढविले. पुनर्मूल्यांकनात पण भरमसाठ शुल्क आकारले जात आहे. दीक्षांत समारंभासाठी जवळपास जास्तीत जास्त ५० लाख रुपये खर्च होत असताना विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारून सुमारे पाच कोटी रुपये प्राप्त केले जातात. अशी विद्यार्थ्यांकडून अवाजवी शुल्क आकारून लूट करणे थांबणे गरजेचे आहे, कारण अशा कारणांमुळे

मागील पाच वर्षांत मुक्त विद्यापीठाकडे विद्यार्थ्यांचा ओढा कमी झाला आहे आणि विद्यार्थी संख्या जवळपास ५० टक्क्यांनी कमी झाली आहे.

आपणास नम्र विनंती की यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ पुनर्मूल्यांकन आणि इतर बाबतीत विद्यार्थ्यांकडून अवास्तव शुल्क आकारत असल्याने त्याला आळा बसवण्याचे निर्देश संबंधितांना द्यावेत.

विद्यापीठातील फोटो कॉपीची प्रक्रिया समजून घेणे आवश्यक आहे. विद्यार्थी ऑनलाइन फॉर्ममध्ये माहिती भरतो. ही माहिती सॉफ्टवेअरच्या डेटाबेसमध्ये साठवली जाते. कर्मचाऱ्यांकडून सॉफ्टवेअरचे एक बटण दाबले जाते आणि स्कॅन केलेल्या प्रतिमा लॉगिनवर किंवा ईमेलवर उपलब्ध होतात. कोणताही खर्च नाही, फोटोकॉपी करण्याची गरज नाही, त्यामुळे हे विनामूल्य असायला हवे, असे डॉ. संजय खडक्कार यांचे म्हणणे आहे.

## एका अपघाताने आयुष्य उदध्वस्त झालेला अष्टपैलू अभिनेता!

### आज अमजद खान यांचा स्मृतिदिन



बॉलीवूडचे प्रसिद्ध अभिनेते अमजद खान यांचे निधन २७ जुलै १९९२ रोजी मुंबईत झाले. तीव्र हृदयविकाराच्या झटक्यामुळे वयाच्या ५१ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. १९७६ मधील एक भीषण अपघात. या अपघातात बरगड्या आणि फुफ्फुसांना गंभीर दुखापत झाली होती. त्यामुळे त्यांचे अकाली निधन झाले. शोले मधला गब्बर आजही नवख्या सिनेमांतल्या खलनायकांना तगडी स्पर्धा देतो. ही भूमिका दिवगंत अभिनेते अमजद खान यांनी साकारली होती. आपल्या संपूर्ण कारकिर्दीत त्यांनी खलनायकी भूमिकांसोबतच सकारात्मक भूमिकाही साकारल्या पण शोले मधील 'गब्बर' म्हणून त्यांना जी लोकप्रियता मिळाली, ती अतुलनीय ठरली. पडद्यावर अमिताभ बच्चन यांच्यासोबतची त्यांची जोडी प्रचंड गाजली. मात्र, एका भीषण अपघाताने अखेर अमजद खान यांचे आयुष्य उध्वस्त केले. या अपघातानंतर ते वर्षभर अंथरुणाला खिळून होते आणि त्यानंतर त्यांचे निधन झाले.

एका मुलाखतीत, अमजद खान यांचा मुलगा अभिनेता शदाब खान यांनी आपल्या वडिलांचा अपघात आणि त्यांच्या आयुष्यातील अखेरच्या दिवसांविषयी मनमोकळेपणाने भाष्य केले. शदाब यांनी सांगितले की, वडिलांच्या त्या भीषण अपघातानंतर, खुद्द अमिताभ बच्चनच त्यांच्या कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले होते. अमिताभ बच्चन आणि अमजद खान यांनी अनेक चित्रपटांमध्ये एकत्र काम केले; शोले व्यतिरिक्त ते याराना, मुकद्दर का सिकंदर, नसीब, शतरंज के खिलाडी, राम बलराम, सत्ते पे सत्ता, कालिया आणि लावारिस यांसारख्या चित्रपटांमध्ये एकत्र दिसले होते. सिनेमांमध्ये जरी अमिताभ आणि अमजद यांनी अनेकदा नायक आणि खलनायकाच्या भूमिका साकारल्या असल्या, तरी खऱ्या आयुष्यात त्यांचे नाते भावांप्रमाणेच प्रेमळ होते.

**अमजद खान यांचा अपघात नेमका कसा घडला?**

गाडीच्या आत नेमकं काय घडलं होतं, असं विचारलं असता शदाबने सांगितले की, 'ते गोव्याच्या दिशेने गाडी चालवत निघाले होते. गाडीत केवळ बाबा आणि चालक असे दोघेच होते; गाडीचं बाबाच चालवत होते. ती पहाटेची वेळ होती आणि पाऊस पडत असल्यामुळे रस्ता ओला झाला होता. अचानकच, समोर एक मोठं वळण आले. त्या काळी आणि आजही लोक तसंच करतात जर एखादा ट्रक रस्त्यावर नादुरुस्त अवस्थेत थांबला, तर त्याची खूण म्हणून लोक त्याभोवती दगड रचून ठेवत असत. तर, अगदी अचानकपणे, आमच्या गाडीच्या अगदी समोरच एक ट्रक उभा असल्याचे दिसून आले. त्या ट्रकला चुकवण्यासाठी, बाबांनी गाडीचे स्टिअरिंग उजवीकडे किंवा डावीकडे जोरात वळवले. रस्ता ओला असल्यामुळे, गाडीवरील ताबा सुटला आणि ती एका झाडावर जाऊन आदळली. आम्हाला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची माहिती बिगबींना देण्यात आली. त्यांनी आम्हाला अत्यंत मोलाची मदत केली; त्यांनी संपूर्ण परिस्थितीची सूत्रे स्वतःच्या हाती घेतली आणि सर्व गोष्टींची उत्तम प्रकारे व्यवस्थापन केले.' त्या भीषण अपघातानंतर वडील, अमजद खान यांची शारीरिक अवस्था कशी झाली होती याबद्दल शादाब खान सांगितले. शादाब म्हणाला, 'त्यांची अनेक हाडे मोडली होती, फुफ्फुसे फुटली होती आणि त्यांच्या घशाला गंभीर दुखापत झाली होती. ते जवळपास वर्षभर अंथरुणाला खिळून होते. त्यांच्या पायात एक सळी बसवावी लागली होती; या शस्त्रक्रियेमुळे त्यांना जवळपास दोन दशके कोणताही व्यायाम करणे शक्य झाले नाही. त्यांचा शारीरिक व्यायाम पूर्णपणे थांबला आणि त्यांचे वजन वाढू लागले.'

अमजद खान यांचे निधन झाले त्या रात्रीच्या घटना सांगताना शादाब अत्यंत भावूक झाला. तो म्हणाला, 'जेव्हा मी घरी परतलो, तेव्हा आईने मला बाबांकडे जाऊन त्यांची विचारपूस करायला सांगितले; कारण ते झोपेतून उठतच नव्हते. जेव्हा मी त्यांच्याजवळ गेलो, तेव्हा मला जाणवले की त्यांचे शरीर थंड पडले होते. बाबांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला होता आणि त्यामुळे डॉक्टरांनी आम्हाला एक विशिष्ट इंजेक्शन आणायला सांगितले.' 'ते इंजेक्शन आणण्यासाठी मी वेड्यासारखा गाडी चालवत गेलो, पण तिथे पोहोचल्यावर मला सांगण्यात आले की, मला पोहोचायला काही सेकंदांचाच उशीर झाला आहे.


### 1976 मधील अमजद खान यांचा भीषण अपघात

आपल्या मृत्यूपूर्वी काही वर्षे १९७६ मध्ये अमजद खान यांचा एक भीषण अपघात झाला होता, ज्यातून ते थोडक्यात बचावले होते. या अपघातात त्यांच्या बरगड्यांना अनेक ठिकाणी फ्रॅक्चर झाले होते आणि फुफ्फुसांनाही गंभीर दुखापत झाली होती; इतकेच नव्हे, तर काही काळासाठी ते कोमामध्येही गेले होते. अमजद खान यांना औषधांचे अत्यंत तीव्र डोस द्यावे लागले होते, ज्यामुळे त्यांचे वजन सातत्याने वाढत गेले. विकी लालवाणी यांना दिलेल्या एका मुलाखतीत, अमजद खान यांच्या मुलाने आपल्या वडिलांच्या त्या अपघाताची आठवण सांगितली आणि अमिताभ बच्चन यांनी त्या कठीण प्रसंगी आपल्या कुटुंबाला कशी मदत केली होती, याबद्दल माहिती दिली.शदाब खानने सांगितले की, अमिताभ बच्चन आणि त्यांचे वडील हे आधीपासूनच मित्र होते पण, त्या अपघातानंतर त्यांच्यातील मैत्रीचे नाते अधिकच घट्ट झाले. 'तो अपघात गोव्यात घडला होता. 'द ग्रेट गॅम्बलर' या चित्रपटाच्या शूटसाठी ते तिथे जात होते. मी आणि माझी आई, आम्हीही त्यांच्यासोबत होतो. त्या अपघातात सर्वांनाच गंभीर दुखापती झाल्या. माझे वडील तर मृत्यूच्या दारातच पोहोचले होते; माझी आईही अत्यंत गंभीररीत्या जखमी झाली होती. माझेही कॉलरबोन मोडले होते.'

### निधनानंतर १० हून अधिक चित्रपट प्रदर्शित

अमजद खान यांच्या निधनानंतर त्यांचे १० हून अधिक चित्रपट प्रदर्शित झाले. शदाबने हा खुलासा केला की, वडिलांचे निधन झाले त्या वेळी, चित्रपटसृष्टीतील विविध लोकांकडे त्यांची १.२७ कोटी रुपयांची रक्कम येणे बाकी होते. वडिलांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबाला अत्यंत कठीण आर्थिक परिस्थितीचा सामना करावा लागला; ही बाब माहित असूनही त्या लोकांनी एकही रुपया परत केला नाही उलट, त्यांनी ती सर्व रक्कम परस्पर हडप केली.

## व्रत-वैकल्ये, सण-उत्सव आणि शिवभक्तीचा काळ!



श्रावण महिना हा हिंदू धर्मियांच्या दृष्टीने अत्यंत पवित्र, मंगलमय आणि निसर्गरम्य महिना मानला जातो. हा महिना म्हणजे व्रत-वैकल्ये, सण-उत्सव आणि शिवभक्तीचा काळ! श्रावणात निसर्गाने हिरवा शालू पांढरलेला असतो आणि वातावरणात एक वेगळाच उत्साह असतो. खाली श्रावण महिन्यातील प्रमुख व्रत-वैकल्ये आणि सणांची सविस्तर माहिती दिली आहे:

**श्रावण महिन्यातील प्रमुख व्रत-वैकल्ये**

**१. श्रावणी सोमवार आणि शिवपूजा**

श्रावणातील प्रत्येक सोमवार अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या दिवशी भगवान शिवाचा (महादेवाचा) जलाभिषेक किंवा दुग्धाभिषेक केला जातो. व्रताची पद्धत: श्रावणी सोमवारी उपवास ठेवला जातो. शिवाला बेलपत्र, पांढरी फुले, आणि अक्षता वाहिल्या जातात. 'ॐ नमः शिवाय' या मंत्राचा जप केला जातो. मुठ मूठ वाहाणे: प्रत्येक सोमवारी वेगवेगळ्या धान्याची मूठ (जसे की तांदूळ, तीळ, मूग, वाळ किंवा सातू) शिवावर वाहिली जाते.

**२. मंगळागौर (श्रावणी मंगळवार)**

नवविवाहित महिलांसाठी मंगळागौरीचे व्रत अत्यंत विशेष असते. लग्नानंतरची पहिली ५ वर्षे हे व्रत केले जाते.

**व्रताची पद्धत :** या दिवशी देवी मंगळागौरीची (पार्वतीचे रूप) पूजा केली जाते.

**सांस्कृतिक महत्त्व :** रात्री जागरण केले जाते, विविध पारंपारिक खेळ (उदा. फुगडी, जिम्मा, गाणी) खेळले जातात. यामुळे महिलांमध्ये उत्साह आणि बंधुभाव वाढतो.


**३. बुध्द-बृहस्पती पूजा (बुधवार व गुरुवार)**

**बुधवार:** काही भागात बुध ग्रहाच्या शांतीसाठी व बुद्धिमत्तेसाठी पूजा केली जाते.

गुरुवार: बृहस्पती (गुरु) आणि दत्तात्रेयाची पूजा केली जाते. गुरुचरित्राचे पारायण किंवा नामस्मरण केले जाते.

**४. जिवतीची पूजा (श्रावणी शुक्रवार)**

श्रावणातील शुक्रवारी विवाहित महिला आपल्या मुलांच्या दीर्घायुष्यासाठी आणि आरोग्यासाठी 'जिवतीची पूजा' करतात.



**व्रताची पद्धत:** जिवतीच्या कागदी चित्राची (किंवा पाटावरील चित्राची) पूजा केली जाते. मुलांना औक्षण करून सुखाची प्रार्थना केली जाते. तसेच महालक्ष्मीची आरती व पूजनाने घरात समृद्धी येते.

**५. मारुती व शनी पूजा (श्रावणी शनिवार)**

श्रावणी शनिवारी हनुमानाची (मारुती) आणि शनीदेवाची पूजा करण्याची परंपरा आहे.

इस दिवशी मारुतीला रुईच्या पानांची माळ, तेल आणि सिंदूर अर्पण केले जाते. शनिवारी अळूच्या पानांची भाजी किंवा पिठले-भाकरीचा नैवेद्य दाखवण्याची प्रथा काही ठिकाणी आढळते.

**६. आदित्य राणूबाई पूजा (श्रावणी रविवार)**

श्रावणातील रविवारी सूर्यदेवाची (आदित्याची) पूजा केली जाते. चांगल्या आरोग्यासाठी आणि निरोगी आयुष्यासाठी सूर्यदेवाला अर्घ्य दिले जाते. या दिवशी अळणी (विना मिठाचे) जेवण करण्याची पद्धत काही कुळांमध्ये असते.

**श्रावणातील मुख्य सण आणि उत्सव**

**नागपंचमी:** श्रावण शुध्द पंचमीला नागाची पूजा केली जाते. या दिवशी मातीच्या किंवा वारुळातील नागाला दुध-लाह्यांचा नैवेद्य दाखवला जातो.

**नारळी पौर्णिमा व रक्षाबंधन:** श्रावण पौर्णिमेला कोळी बांधव समुद्राला नारळ अर्पण करून पूजा करतात. याच दिवशी बहीण भावाच्या हातावर राखी बांधून रक्षाबंधन साजरे करते.

**गोकुळाष्टमी व दहीहंडी:** श्रावण वद्य अष्टमीला श्रीकृष्णाचा जन्मदिवस साजरा केला जातो. दुसऱ्या दिवशी दहीहंडीचा उत्साह असतो.

सिटी न्यूज अकोला

सोमवार, दि. २७जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# चिंतामणी नगरात साचलेल्या पाण्याने नागरिक हैराण

## डासांचा वाढता प्रादुर्भाव, प्रशासनाचे दुर्लक्ष?

प्रतिनिधी २७ जुलै

**अकोला :** शहरातील जुने शहर परिसरातील चिंतामणी नगर, बाळापूर रोड येथे मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने नागरिकांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. पाण्याचा निचरा होत नसल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढला असून परिसरातील नागरिकांनी महापालिका प्रशासनाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.



अकोला शहरातील जुने शहर परिसरातील चिंतामणी नगर, बाळापूर रोड येथे मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने संपूर्ण परिसर डबक्यात बदलला आहे. पावसाचे पाणी अनेक दिवसांपासून तसचे साचून असल्यामुळे त्याचा निचरा होत नसल्याचे चित्र आहे. परिणामी या परिसरात डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला असून नागरिकांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.


साचलेल्या पाण्यात विविध पक्षीही मोठ्या प्रमाणात येत असल्याचे दिसून येत आहे. मात्र दुसरीकडे अस्वच्छता आणि डासांच्या वाढत्या संख्येमुळे डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. नागरिकांना रोज या डबक्यांमधून ये-जा करावी लागत असून मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

स्थानिक नागरिकांनी महापालिका प्रशासनाने तातडीने या ठिकाणचा पाण्याचा निचरा करावा, औषध फवारणी करावी आणि कायमस्वरूपी उपाययोजना करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी केली आहे. आता या गंभीर समस्येकडे प्रशासन किती वेगाने लक्ष देते, याकडे संपूर्ण परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# मूर्तिजापूर तहसील रोड अंधाराच्या विळख्यात!

## प्रशासन झोपेत, नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू

प्रतिनिधी २७ जुलै



**मूर्तिजापूर :** मूर्तिजापूर शहरातील अत्यंत वर्दळीचा आणि महत्त्वाचा तहसील रोड गेल्या अनेक दिवसांपासून अंधाराच्या विळख्यात सापडला आहे. या रस्त्यावरील सर्व पथदिवे बंद असल्याने नागरिकांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. विशेष म्हणजे, याच रस्त्यावर मूर्तिजापूर शहर पोलीस स्टेशन, अनेक दुकाने, झेरॉक्स सेंटर, तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी (SDO) कार्यालय, उपकोषागार कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय तसेच तहसील मैदान आहे. दररोज हजारो नागरिक, महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि शासकीय कर्मचाऱ्यांची या मार्गावर मोठी वर्दळ असते. संध्याकाळ होताच संपूर्ण परिसर अंधारात बुडत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तहसील मैदानावर फिरण्यासाठी येणारे नागरिक, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना रात्री घरी परतताना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या रस्त्यावर यापूर्वी मोबाईल चोरी व हरवण्याच्या घटना घडल्या आहेत. अंधाराचा फायदा घेऊन चोरटे आणि समाजकंटक सक्रिय होण्याची शक्यता अधिक वाढली असून, किरकोळ अपघातही घडत आहेत. जर प्रशासनाने वेळेत दखल घेतली नाही, तर भविष्यात एखादी गंभीर दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी नेमकी कोण घेणार, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. विशेष बाब म्हणजे, ज्या रस्त्यावर पोलीस स्टेशन आणि अनेक शासकीय कार्यालये आहेत, त्याच रस्त्यावर पथदिवे बंद असणे ही अत्यंत गंभीर आणि लाजिरवाणी बाब मानली जात आहे. प्रशासनाने तातडीने या समस्येकडे लक्ष देऊन सर्व पथदिवे सुरू करावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### या रस्त्याची दुरूस्ती तातडीने करा, नागरिकांची मागणी

येथील प्रवाशांसाठी अत्यंत महत्वाच्या असणाऱ्या या मुख्य रस्त्याची अवस्था सध्या दयानीय झाली आहे. बस स्थानकाच्या अगदी बाहेर असणारा हा रस्ता पुढे रेल्वे स्टेशनकडे जाणारा एकमेव मार्ग आहे. त्यामुळे सर्व एसटी बसेस, ऑटो आणि रेल्वे प्रवाशांची याच एका रस्त्यावरून २४ तास वर्दळ असते.दुसरा कोणताही पर्याय नसल्याने नागरिकांना नाईलाजाने याच खड्डेमय रस्त्यावरून प्रवास करावा लागत आहे. त्यातच आता पावसाळा सुरू झाल्यामुळे परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे. पावसात खड्डयांमध्ये पाणी साचल्यामुळे खड्डा नक्की किती खोल आहे, याचा अंजिबात अंदाज वाहनधारकांना येत नाही.

# पातूर नगरपरिषदेच्या पहिल्याच सभेत महत्त्वाचे निर्णय; शाळा सुरू करण्यासाठी ठराव मंजूर

प्रतिनिधी २७ जुलै

**पातूर :** पातूर नगरपरिषदेच्या नव्याने स्थापन झालेल्या सर्वसाधारण सभेची पहिली बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीत शहराच्या विकासाशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करून विविध ठरावांना मंजुरी देण्यात आली.

बैठकीदरम्यान नगरपरिषदेच्या हद्दीबाहेर कार्यरत असलेल्या काही शैक्षणिक संस्थांच्या मान्यतेबाबतचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. यासंदर्भात संबंधित संस्थांची मान्यता रद्द करण्याचा ठराव सभेत मांडण्यात आला.

याचवेळी पातूर शहरातील बंद पडलेल्या उर्दू व मराठी नगरपरिषद शाळांचा प्रश्नही सभेत उपस्थित करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून या दोन्ही शाळा पुन्हा सुरू करण्यासाठी



आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन नगराध्यक्षांनी दिले. तसेच यासाठी सभेत ठराव मंजूर करण्यात आला.

या निर्णयामुळे शहरातील विद्यार्थी, पालक आणि नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, नगरपरिषद प्रशासनाने लवकरात लवकर पुढील प्रक्रिया पूर्ण करून शाळा सुरू कराव्यात, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# कुमारीचा विनयभंग प्रकरणी पोस्को नुसार गुन्हा दाखल

**हिवरखेड :** हिवरखेड पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या दानापूर येथील सिद्धार्थ नगरातील झोपडपट्टी मध्ये रहिवाशी कुमारी युवतीचे आई वडील कामाला गेले असता, ती घरात अभ्यास करीत होती, २४ जुलैच्या सकाळी ९ दरम्यान दोन तरुण युवक तिच्या घरापुढे येऊन तिला वाईट नजरेने खूणा करीत होते, व ती घाबरली असता तिने आरडाओरडा केली अशी माहिती तिने पोलिस स्टेशन मध्ये दिली. या मध्ये तिला त्या दोन तरुणांनी लोटा लाटी केल्याने तिच्या छातीला नखे लागली शेजारी रहिवाशी आल्यावर हे दोन तरुण पळून गेले, या घटनेची सर्व हिकिकत तिने तिच्या आईला सांगितली आईने व तिच्या भावाने तत्काळ हिवरखेड पोलिस स्टेशन मध्ये धाव घेतली.

# सोन्याची पोत हिसकावणारा आरोपी जेरबंद

प्रतिनिधी २७ जुलै

**अकोला :** शहरातील जनता भाजी बाजार परिसरात वृद्ध महिलेवर हल्ला करून तिच्या गळ्यातील सोन्याची पोत हिसकावणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या काही दिवसांत अटक केली. आरोपीकडून चोरीस गेलेला १०० टक्के मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.



९ जुलै २०२६ रोजी दुपारच्या सुमारास मोठी उमरी येथील ८२ वर्षीय महिला सूनीसह बाजारातून घरी परतत असताना विदर्भ हँडलूमसमोर अज्ञात इसमाने त्यांच्या गळ्यातील सोन्याची पोत हिसकावण्याचा प्रयत्न केला. महिलेने प्रतिकार केल्यानंतर आरोपीने त्यांच्यावर हल्ला करून जबरदस्तीने पोत हिसकावून घटनास्थळावरून पलायन केले. या प्रकरणी सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास सुरू केला. तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे जनता भाजी बाजार परिसरात सापळा रचून संशयिताला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यानेच वृद्ध महिलेची सोन्याची पोत हिसकावल्याची कबुली दिली. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव समीर खान नासीर खान (वय २९, रा. आडगाव बु., ता. तेल्हारा, जि. अकोला) असे आहे. तपासादरम्यान आरोपीकडून चोरीस गेलेला संपूर्ण सोन्याचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# पातूरच्या रेस्ट हाऊस रोडवर जीवघेणा खड्डा, अपघातांचे सत्र सुरूच

## पावसाच्या पाण्यामुळे खड्डा दिसेनासा नागरिक आणि वाहनचालकांचा जीव धोक्यात



प्रतिनिधी २७ जुलै

**पातूर :** शहरातील अत्यंत वर्दळीच्या रेस्ट हाऊस रोडवरील मोठा खड्डा नागरिकांसाठी जीवघेणा ठरत आहे. पावसाच्या पाण्याने खड्डा पूर्ण भरल्याने अनेक दुचाकीस्वार आणि पादचारी घसरून जखमी झाले आहेत. संतप्त नागरिकांनी ग्रामपंचायत प्रशासनाकडे तातडीने खड्डा बुजवण्याची मागणी केली असून, दुर्लक्ष झाल्यास आंदोलनाचा इशाराही दिला आहे.

रेस्ट हाऊस रोड हा न्यायालय, भूमी अभिलेख कार्यालय, विश्रामगृह, शाहाबाबू शाळा तसेच अनेक शासकीय कार्यालयांना जोडणारा अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. या रस्त्यावरून दिवसभर विद्यार्थी, नागरिक, कर्मचारी, वकील आणि लहान-मोठ्या वाहनांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते.मात्र शाहाबाबू शाळेजवळ रस्त्यालगत पडलेला मोठा खड्डा आता अपघाताचे प्रमुख कारण ठरत आहे. सततच्या पावसामुळे या खड्ड्यात पाणी साचत असल्याने त्याची खोली वाहनचालकांच्या लक्षात येत नाही. परिणामी अनेक दुचाकीस्वार घसरून पडत असून पादचाऱ्यांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

विशेष म्हणजे हा रस्ता मुख्य महामार्गाला जोडणारा असल्याने येथे वाहतुकीची कायम वर्दळ असते.

शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना या मार्गावरून प्रवास करताना जीव मुठीत धरावा लागत आहे. सुदैवाने अद्याप मोठी दुर्घटना घडलेली नसली, तरी प्रशासनाने वेळेत उपाययोजना न केल्यास गंभीर अपघात होण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत. संतप्त नागरिकांनी ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने हा खड्डा बुजवून रस्ता सुरक्षित करावा, अशी जोरदार मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देत प्रशासनाच्या दुर्लक्षाविरोधात नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

# मोर्णा नदीच्या काठावर सट्ट्याचा अड्डा सुसाट

प्रतिनिधी २७ जुलै

**अकोला :** आषाढी एकादशीनिमित्त एकीकडे पंढरपूरच्या चंद्रभागा नदीच्या तीरावर लाखो वारकऱ्यांची प्रचंड गर्दी पाहायला मिळाली, तर दुसरीकडे अकोला शहरात नदीकाठी अगदी उलट चित्र पाहायला मिळत आहे. अकोला शहराचे दोन भाग करणाऱ्या मोर्णा नदीच्या काठावर दररोज शेकडो सट्टेबाजांची गर्दी जमू लागली आहे.

नदीच्या काठावर अतिक्रमण करून आणि काँक्रीट टाकून त्याठिकाणी शेड उभारण्यात आले आहे. या संपूर्ण रस्त्यावर वरली लावण्यासाठी येणाऱ्यांच्या वाहनांची प्रचंड गर्दी होत असल्याने परिसरातील वाहतुकीचा बोजवारा उडाला आहे. आता लवकरच श्रावण महिना सुरू होत आहे; श्रावण सोमवारी याच राजेश्वर पुलावरून भाविकांची मोठी ये-जा सुरू असते.

## जुने शहर पोलीस ठाण्याच्या अगदी मागेच टेबल वरली सुरु



विशेष म्हणजे जुने शहर पोलीस ठाण्याच्या अगदी मागे आणि सिटी कोतवाली पोलीस ठाण्यापासून अवघ्या काही अंतरावर हा वरलीचा अड्डा राजरोसपणे सुरू आहे. पोलीस ठाण्यांच्या नाकाखाली चालणाऱ्या या वरली अड्ड्यावर पोलिसांनी तात्काळ कडक कारवाई करावी, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांमधून केली जात आहे.

# सेंट पॉल अकॅडमीत आषाढी एकादशी उत्साहात

वि. प्रतिनिधी २७ जुलै

**अकोट :** लाल बहादूर शास्त्री ज्ञानपीठ तथा सेंट पॉल अकॅडमी, अकोला रोड, अकोट येथे आषाढी एकादशीचा उत्सव विठ्ठलमय वातावरणात आणि भक्तिभावाने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. टाळ-चिपळ्यांचा गजर, वारकरी वेशभूषा, दिंडी आणि विठ्ठल नामस्मरणाने संपूर्ण शाळा परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष नवनीतजी लखोटिया होते. यावेळी उपाध्यक्ष लुणकरणजी डागा, सचिव प्रमोदजी चांडक, कोषाध्यक्ष रेखा चांडक, सदस्या शारदा लखोटिया, दीपम लखोटिया व अवनी लखोटिया उपस्थित होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक रामेश्वर पातोंड, पर्यवेक्षक विशाल चांदुरकर, बचपन प्ले स्कूलच्या मुख्याध्यापिका कोमल मन्नी व निलिमा देशमुख मंचावर उपस्थित होत्या.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.विठ्ठल-रुक्मिणीच्या वेशभूषेत असलेल्या संभाजी खोकले आणि आरणा फोकमारे यांचे पूजन करून पालखीचे स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांनी टाळ-चिपळ्यांच्या गजरात आणि "ज्ञानेश्वर माऊली"च्या जयघोषात दिंडी काढून पालखीची मिरवणूक काढली. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी प्रबोधनपर कीर्तन सादर केले. स्वराज मार्के याने कीर्तनकाराची भूमिका प्रभावीपणे साकारली, तर अक्षय शेंदुरकर यांनी वादनाची साथ दिली. इयत्ता सातवी, आठवी व नववीच्या विद्यार्थिनींनी विठ्ठल गीतांवर नृत्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. महेश शर्मा यांनी सुमधुर गायनातून आषाढी एकादशीचे महत्त्व आणि आख्यायिका उलगडून सांगितली.

वारकरी वेशातील विद्यार्थी आणि नऊवारी साड्यांतील विद्यार्थिनी फुगडी, पावली खेळत विठ्ठल नामस्मरणात रमल्या होत्या. त्यामुळे शाळेच्या प्रांगणात साक्षात पंढरपूर अवतरल्याचा अनुभव उपस्थितांना आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदकिशोर पनायकार यांनी केले. प्रमोदजी चांडक यांनी मनोगत व्यक्त करत कार्यक्रमाचे कौतुक केले. तर आभार प्रदर्शन रुपाली चांदुरकर यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांना राजगिऱ्याचे लाडू वाटप करून करण्यात आली.

# शिक्षणाच्या मंदिरात मद्यपींचा अड्डा, तुंबलेली शौचालये व साचलेले पाणी


निखिल टिकले २७ जुलै

**अकोट :** नगर परिषदेचे मुख्य अधिकारी सध्या शासकीय शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी 'एक वर्ग असाही' सारखे उपक्रम राबवत असल्याचा मोठा गाजावाजा आहे. मात्र, प्रशासनाचा हा दावा किती पोकळ आहे, याचे जिवंत उदाहरण शहरातील वेगवेगळ्या नगर परिषद शाळांच्या दुरवस्थेवरून समोर आले आहे.

एकीकडे अधिकारी उपक्रमांच्या जाहिरातीत व्यस्त असताना, प्रत्यक्षात मात्र शाळा गवत, कचरा आणि दारूच्या बाटल्यांच्या विळख्यात सापडल्या आहेत. नगर परिषदेच्या या ढिसाळ कारभारामुळे आणि शिक्षणाधिकाऱ्यांच्या अक्षम्य दुर्लक्षामुळेच वैतागलेले सामान्य गरीब पालक आता आपल्या मुलांना खाजगी शाळांमध्ये प्रवेश देण्यासाठी धाव घेत असल्याचे विदारक चित्र शहरात पाहायला मिळत आहे.शाळा क्र. १ चे उखडलेले मैदान आणि सुरक्षा व्यवस्था रामभरोसेअकोट येथील नगर परिषद शाळा क्र. १ च्या मैदानाची अवस्था अत्यंत



लाजीरवाणी झाली आहे. या शाळा परिसरातील मैदान पूर्णपणे उखडलेले असून तिथे जागोजागी दगड-धोंडे, कचरा आणि जंगली गवत पसरले आहे. शाळा सुरू होऊन महिना उलटला तरीही मैदानाची साधी साफसफाई करण्यात आलेली नाही. या आवारात लहान मुलांच्या सुरक्षिततेची कोणतीही ठोस व्यवस्था नसल्याचे विदारक चित्र उघड झाले आहे.नगर परिषद शाळा क्र. ३ च्या मैदानाचा बनला झाडीझुडपांचा विळखा अकोट येथील नगर परिषद शाळा क्र. ३ ची अवस्थाही फारसी वेगळी नाही. शाळा क्र. ३ चे विस्तीर्ण मैदान स्वच्छ ठेवण्याऐवजी तिथे जंगली गवत आणि झाडीझुडपे वाढली आहेत. मैदानाच्या एका कोपऱ्यात असलेली शौचालयांची इमारत अत्यंत जुनाट आणि पडक्या अवस्थेत आहे. शाळकरी विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची अपुरी व्यवस्था आहे, तर शौचालयांची अत्यंत भीषण आणि दुर्गंधीयुक्त अवस्था झाली आहे. यामुळे शाळकरी मुलींची मोठी कोंडी होत असून, विद्यार्थ्यांना संसर्गजन्य आजार होण्याची दाट शक्यता निर्माण



> गवतावर फवारा मारण्याचे काम चालू आहे.शाळेच्या परिसरामध्ये मद्यपींचा वावर नेहमीच असतो. शाळेमध्ये आल्यानंतर आम्हाला सर्वप्रथम मद्यपींनी केलेला कचरा साफ करावा लागतो. याबाबत आम्ही वरिष्ठांना सांगितलेले आहे.
>
> **शमशाद युनिसा हरून अली,**
> मुख्याध्यापिका उर्दू शाळा क्र. 4

झाली आहे.उर्दू शाळा क्र. ४ मध्ये मद्यप्यांचा धुमाकूळ नगर परिषद उर्दू शाळा क्र. ४ मधून समोर आलेले वास्तव अत्यंत लाजिरवाणे आहे. या शाळेच्या परिसरात मद्यपी लोकांचा मुक्त वावर असून, शाळेला रात्रीच्या वेळी मद्यप्यांचा अड्डा बनवले जात आहे. इमारतीच्या आडोशाला दारूच्या रिकाम्या बाटल्या, पाण्याच्या बॉटल्स, डिस्पोजेबल प्लास्टिक ग्लास आणि कचऱ्याचा खच पडलेला साफ दिसून येत आहे. इमारतीचे प्लास्टर पूर्णपणे निघून गेले असून आतील विटा उघड्या पडल्या आहेत. दिवसा याच परिसरात चिमुरडी मुले शिक्षणाचे धडे गिरवायला येतात, त्यांच्या मनावर या घाणेरड्या वातावरणाचा काय परिणाम होईल, याचा साधा विचारही प्रशासनाने केलेला नाही. शिक्षणाधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची तीव्र गरज शासकीय शाळा टिकवणे आणि त्यांचा दर्जा सुधारणे ही शिक्षण विभागाची मुख्य जिम्मेदारी आहे. मात्र, अकोटमधील शिक्षणाधिकाऱ्यांचे या शाळांकडे साफ दुर्लक्ष झाले आहे. शाळा सुरू होऊन महिना उलटला तरीही शिक्षणाधिकाऱ्यांनी शाळांना भेटी देऊन येथील समस्या जाणून घेण्याची तसदी घेतलेली नाही. अधिकारी एसी केबिनमधून बाहेर पडत नसल्यानेच शासकीय शाळांची ही नरकयातना सुरू आहे.एकीकडे मुख्य अधिकाऱ्यांनी स्वतः पुढाकार घेऊन 'एक वर्ग असाही' सारखे उपक्रम चालवणे आणि दुसरीकडे एकामागून एक शाळांची अशी दुरवस्था समोर येणे, यावरून नगर परिषदेच्या नियोजनशून्य कारभाराचे धिंडवडे निघाले आहेत.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. २७ जुलै २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# 'विद्यार्थ्यांना न्याय द्या'; यवतमाळात जनआक्रोश आंदोलन

प्रतिनिधी २७ जुलै




**यवतमाळ** : दिल्लीतील विद्यार्थी आंदोलन आणि महाराष्ट्रातील टीईटी प्रश्नपत्रिका फुटीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी जनआक्रोश समितीच्या वतीने संविधान चौकात आंदोलन करण्यात आले. विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, तसेच शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींसाठी जबाबदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

या आंदोलनादरम्यान केंद्र व राज्य सरकारविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देण्याबरोबरच आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, अशी मागणी करण्यात आली. महाराष्ट्रातील टीईटी प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, असेही आंदोलकांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या समस्या केवळ आर्थिक मदतीने सुटणार नाहीत. शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी दूर करून जबाबदार व्यक्तींवर कारवाई करणे गरजेचे असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे होते. यावेळी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, तसेच टीईटी प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनीही पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. आंदोलनकर्त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान आणि राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. विद्यार्थ्यांना न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशाराही विद्यार्थी जनआक्रोश समितीने दिला.

# ज्वेलर्स चोरीचा पर्दाफाश; पुण्यातून दोघे जेरबंद

## आरोपींना सहा दिवस पीसीआर : चार साथीदार फरार, अनेक राज्यांत शोधमोहीम

प्रतिनिधी २७ जुलै




**यवतमाळ** : पांढरकवडा तालुक्यातील मोहदा येथील राजेंद्र ज्वेलर्समध्ये झालेल्या सुमारे ९७ लाख रुपयांच्या दागिने चोरुन नेल्याची घटना घडली होती. या प्रकरणी पोलिसांनी तपासाला वेग देत पुणे जिल्ह्यातून दोन आरोपींना अटक केली आहे. या प्रकरणातील चोरीचा मुद्देमाल अद्याप हस्तगत झालेला नाही. न्यायालयाने दोघांना सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे. गुन्ह्यातील अन्य चार साथीदारांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

विशाल रघू कुमार (वय २८, रा. चाकण, ता. खेड, जि. पुणे) आणि सोरपरी ऊर्फ सोरसिंग राजकुमार राठोड (वय ३४, रा. राठोड वस्ती, डाळींब, ता. दौंड, जि. पुणे) अशी आरोपींची नावे आहे. जुलै महिन्यात मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी राजेंद्र ज्वेलर्सचे शटर तोडून दुकानात प्रवेश केला होता. त्यानंतर सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा सुमारे ९७ लाख रुपयांचा ऐवज लंपास करण्यात आला होता. या घटनेनंतर परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.



तपासादरम्यान पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढला. त्यानंतर पुणे परिसरात कारवाई करून दोघांना ताब्यात घेण्यात आले. मात्र, त्यांच्याकडून अद्याप चोरीतील मुद्देमाल किंवा अन्य साथीदारांबाबत ठोस माहिती मिळालेली नसल्याने तपास सुरू आहे. दरम्यान, उर्वरित चार आरोपींना अटक करून चोरीतील मुद्देमाल जप्त करण्यासाठी विशेष पथके विविध राज्यांत शोधमोहीम राबवत आहेत. आरोपींच्या चौकशीतून या गुन्ह्यामागील संपूर्ण साखळी उघड होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. व्यापारी वर्गाने आरोपींना अटक झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले असले, तरी चोरीला गेलेला संपूर्ण मुद्देमाल लवकरात लवकर हस्तगत करून उर्वरित आरोपींनाही अटक करण्याची मागणी केली आहे.

# उमरखेडमध्ये युवक काँग्रेसचे स्वाक्षरी आंदोलन

प्रतिनिधी २७ जुलै




**उमरखेड** : दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा देत आणि विद्यार्थ्यांवरील कथित लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ उमरखेड शहर युवक काँग्रेसच्या वतीने शुक्रवारी महात्मा गांधी पुतळ्यासमोर स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले. या आंदोलनात युवक काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांना पाठिंबा दर्शविला.

स्वाक्षरी अभियानादरम्यान युवक काँग्रेसने केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांची जाहीर माफी मागावी तसेच आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांशी कथित अमानुष वागणूक देणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशा तीन प्रमुख मागण्या केल्या.

अभियानादरम्यान विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ मोठ्या प्रमाणावर स्वाक्षऱ्या संकलित करण्यात आल्या. विद्यार्थ्यांवरील कथित लाठीहल्ला आणि पोलिस कारवाईचा निषेध व्यक्त करत केंद्र सरकारने विद्यार्थ्यांच्या मागण्यांची तातडीने दखल घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा आवाज दडपण्याऐवजी त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक तोडगा काढणे ही सरकारची जबाबदारी आहे. देशातील विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी युवक काँग्रेस कायम त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहील, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

या स्वाक्षरी अभियानात काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस गोपाल अग्रवाल, युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष ईश्वर गोस्वामी, उपाध्यक्ष दर्शन भंडारी, अक्षय अभय गोस्वामी, देवा इंगोले, सिद्धेश्वर जगताप, प्रकाश वानखेडे, कैलास इंगोले, सूरज जाधव, शंकर टमके यांच्यासह युवक काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# उमरखेडमध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर'

प्रतिनिधी २७ जुलै





**उमरखेड** : महसूल व वन विभागाच्या वतीने आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान' रविवारी उमरखेड येथील राजस्थान भवनात उत्साहात पार पडले. विविध शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्याने नागरिकांनी शिबिराला मोठा प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज व अन्य महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी आमदार किसनराव वानखेडे होते.

## हजारो नागरिकांनी घेतला शासकीय योजनांचा लाभ

माजी आमदार विजयराव खडसे, माजी आमदार नामदेवराव ससाणे, नगराध्यक्ष तेजस्वी जैन, उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे, मुख्याधिकारी अजय कुरवाडे, तहसीलदार सुरडकर, तहसीलदार अनिल मस्के, गटविकास अधिकारी किरण कोळपे, वनपरिक्षेत्र अधिकारी दत्ता पवार, शिक्षण अधिकारी विजय बेतेवाड, तालुका कृषी अधिकारी अभय वडकुते यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

शिबिरात शेतकरी प्रमाणपत्र, जिवंत सातबारा अभियान, गावठाण प्रकरणे, अतिक्रमण नियमितीकरण, मुख्यमंत्री बळीराजा शेतपांदण रस्ते योजना, महिलांसाठीच्या विविध योजना तसेच जातीचा, उत्पन्नाचा आणि रहिवासी दाखला आदी शासकीय सेवांचा लाभ नागरिकांना देण्यात आला. यावेळी पात्र लाभार्थ्यांना प्रशस्तीपत्रे व शासकीय साहित्याचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांची दाद मिळविली.

आमदार किसनराव वानखेडे यांनी शासनाच्या सर्व योजना शेवटच्या लाभार्थ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. उमरखेड व महागाव तालुक्यातील कोणताही पात्र नागरिक शासकीय योजनांपासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

नितीन भूतडा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासन शेतकरी व सर्वसामान्यांच्या हितासाठी विविध कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवत असल्याचे सांगत प्रत्येक पात्र नागरिकाने या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

शिबिरादरम्यान रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले. हजारो नागरिकांनी विविध शासकीय योजनांचा लाभ घेतला. कार्यक्रमाचे नियोजन महसूल विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केले. सूत्रसंचालन शंकर चव्हाण यांनी केले, तर आभार महसूल प्रशासनाच्या वतीने मानण्यात आले.

# संतभूमीत संत जगनाडे महाराजांच्या पुतळ्याचे भूमिपूजन

प्रतिनिधी २७ जुलै



**बाभुळगाव** : तालुक्यातील खडकसावंगा येथे उभारण्यात येत असलेल्या संतभूमीमध्ये संत जगनाडे महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या उभारणीसाठी भूमिपूजन सोहळा उत्साहात पार पडला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विधिवत पूजन करून पुतळ्याच्या उभारणीच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला.

आचार्य डॉ. मिलिंद बोधी यांच्या संकल्पनेतून साकार होत असलेल्या संतभूमीत समाजप्रबोधन करणाऱ्या विद्रोही संत-महापुरुषांचे विचार पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावेत, त्यांच्या कार्याची प्रेरणा समाजाला मिळावी आणि समता, बंधुता व मानवतेची मूल्ये दृढ व्हावीत, या उद्देशाने विविध संतांचे पूर्णाकृती पुतळे उभारले जाणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

कार्यक्रमात भारतातील संतपरंपरेने सामाजिक समता, अंधश्रद्धा निर्मूलन आणि मानवतावादी विचारांचा प्रसार करण्यासाठी दिलेल्या योगदानावर मान्यवरांनी प्रकाश टाकला. संतभूमी हा परिसर सामाजिक परिवर्तनाच्या विचारांचे प्रेरणास्थान ठरेल, असा विश्वासही वक्त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला भारतीय तेली समाजाचे अध्यक्ष ॲड. डॉ. रमेश पिसे, डॉ. कृष्णाजी बेले, डॉ. उमेश कोरम, डॉ. विलास काळे, ॲड. संजूताई गभणे, डॉ. प्रशांत झाडे, प्रा. रेखा लोहकरे, प्रा. ज्ञानेश्वर रायमल, संताजी सृष्टी, सुनिता काळे, सोनू कांबळे, चौधरी साहेब (पुणे), रवी चरडे, सुभाष नगराळे, मनोहर कांबळे, शोभनाताई कोटंबे, संगीता कांबळे, पत्रकार पद्माकर घायवान, शालिनी घायवान, प्रकाश गायकवाड, राजू बोरकर यांच्यासह तेली समाजातील महिला-पुरुष आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विलास काळे यांनी केले, तर आभार पत्रकार रवींद्र चरडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ॲड. संजूताई गभणे (चरडे), त्यांच्या सहकाऱ्यांनी आणि संतभूमी परिवाराने विशेष परिश्रम घेतले.

# दिग्रसमध्ये ३० जुलैला गुणवंतांचा गौरव; पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते होणार सत्कार

प्रतिनिधी २७ जुलै



**दिग्रस** : दिग्रस शहर व तालुक्यातील दहावी व बारावीच्या शालांत परीक्षेत ७५ टक्क्यांहून अधिक गुण मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य कौतुक सोहळा गुरुवार (दि. ३०) रोजी सकाळी ११ वाजता दारव्हा रोडवरील बसस्थानकासमोरील राजेश्वर मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळचे पालकमंत्री आणि दिग्रस मतदारसंघाचे आमदार ना. संजय राठोड यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार असून, त्यांच्या पालकांचाही विशेष सन्मान केला जाणार आहे.

यापूर्वी हा कार्यक्रम २७ जून रोजी नियोजित होता. मात्र, अपरिहार्य कारणांमुळे तो पुढे ढकलण्यात आला होता. आता ३० जुलै रोजी हा सोहळा होणार असून, सर्व गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. या उपक्रमांतर्गत दहावी व बारावीच्या परीक्षेत ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविलेल्या शेकडो विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस प्रेरणा मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम गेल्या १७ वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येत आहे. या सोहळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांच्या यशामागे मोलाचे योगदान देणाऱ्या पालकांचाही विशेष सन्मान करण्यात येणार आहे. मुलांच्या शिक्षणासाठी केलेले परिश्रम, त्याग आणि मार्गदर्शनाचा गौरव व्हावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले. दिग्रस शहर व तालुक्यातील विविध शाळांकडून ७५ टक्क्यांहून अधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांची यादी प्राप्त झाली असून, सर्व गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींनी पालकांसह उपस्थित राहून गौरव स्वीकारावा, असे आवाहन शिवसेना, युवासेना, विद्यार्थीसेना आणि शिवसेना महिला आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे.

# ३६ वर्षांनी जन्मभूमीत परतल्या साध्वी श्री

## दिग्रसच्या चातुर्मासाला भक्तीचा ऐतिहासिक प्रारंभ

प्रतिनिधी २७ जुलै



**दिग्रस** : दिग्रसच्या धार्मिक आणि सामाजिक इतिहासात रविवारी सुवर्णाक्षरांनी नोंद होईल असा ऐतिहासिक क्षण अनुभवायला मिळाला. दिग्रस येथील जैन समाजातील स्वर्गीय जबरचंदजी भंडारी यांच्या कन्या तथा तीर्थ उद्धारक परमपूज्य चारुवर्ता श्रीजी महाराज यांच्या सुशिष्या परमपूज्य नम्रवर्ता श्रीजी महाराज यांनी दीक्षा स्वीकारल्यानंतर तब्बल ३६ वर्षांनी चातुर्मासासाठी आपल्या जन्मभूमीत मंगल आगमन केले. त्यांच्या समवेत परमपूज्य मीतवर्ता श्रीजी महाराज यांचेही आगमन झाल्याने संपूर्ण दिग्रस नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली.

दुर्गामाता चौक येथील जैन उपाश्रयात धार्मिक विधी, मंगलाचरण आणि पारंपरिक स्वागतानंतर जैन श्रीसंघाच्या वतीने भव्य नगरप्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून शहरातील प्रमुख मार्गांवरून निघालेल्या मिरवणुकीत हजारो भाविक सहभागी झाले होते. ढोल-ताशांचा निनाद, मंगलध्वनी, जयघोष आणि ठिकठिकाणी करण्यात आलेली पुष्पवृष्टी यामुळे संपूर्ण शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

दिग्रसच्या कन्येचे साध्वी स्वरूपात ३६ वर्षांनंतर जन्मभूमीत आगमन होत असल्याने जैन समाजासह सर्व धर्मीय नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता होती. साध्वी श्रींच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली. इंदौर, पुणे, अकोला, दारव्हा तसेच अन्य शहरांमधूनही भाविक या ऐतिहासिक सोहळ्याला उपस्थित राहिले. चातुर्मासाच्या चार महिन्यांत प्रवचन, स्वाध्याय, धर्मचर्चा, तप-साधना, संस्कारवर्ग आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी जैन श्रीसंघाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधव मोठ्या उत्साहाने परिश्रम घेत आहेत. साध्वी श्रींच्या आगमनामुळे दिग्रसमधील धार्मिक वातावरणाला नवी ऊर्जा मिळाली असून, हा चातुर्मास महोत्सव जैन समाजाबरोबरच संपूर्ण शहरासाठी अभिमानाचा आणि संस्मरणीय ठरणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

# राष्ट्रवादी काँग्रेसला बळ; अनेक कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश

प्रतिनिधी २७ जुलै



**उमरखेड** : राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाच्या संघटन विस्ताराला उमरखेडमध्ये वेग आला असून शनिवारी झालेल्या पक्षप्रवेश सोहळ्यात अनेक कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला. राज्याचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात शहरातील पक्षबांधणी अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या निवासस्थानी आयोजित कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाळाभाऊ पाटील कामारकर यांच्या हस्ते नव्या कार्यकर्त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी तालुकाध्यक्ष शंकर तालंगकर, तालुका कार्याध्यक्ष प्रकाश राठोड, सतीश सव्वाशे, महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षा वनिता चव्हाण, अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष शाहरुख पठाण यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. उमरखेड शहराध्यक्ष दामोदर इंगोले यांच्या नेतृत्वाखाली हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी मार्गदर्शन करताना राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी उमरखेड शहरात राष्ट्रवादी काँग्रेसची संघटना अधिक व्यापक करण्याचे आवाहन केले. शहराच्या विकासाला गती देतानाच पक्षबांधणीवर विशेष भर दिला जाईल, असे त्यांनी सांगितले. यावेळी आश्विनी भोकरे, दीपाली राठोड, रेखा गायकवाड, यश जाधव, विठ्ठल पवार, श्रीकांत जाधव, अर्जुन चव्हाण, गजानन इंगोले, अथर खतीब, श्रीधर इंगोले, ओमकार वानखेडे, गजानन जाधव, रोहन पातोडे, वीर राठोड यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. या पक्षप्रवेशामुळे उमरखेड शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या संघटनात्मक बळात आणखी वाढ होणार असल्याचा विश्वास पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती

सोमवार, दि. २७ जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



## शबरी महामंडळाच्या 11 लाभार्थ्यांना धनादेशाचे वितरण

**अमरावती :** शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ आणि राज्य शासनाच्या विविध योजनांतील 11 पात्र लाभार्थ्यांना आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्या हस्ते धनादेशाचे वितरण करण्यात आले. यावेळी आमदार केवलराम काळे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या प्रशासन महाव्यवस्थापक जयरेखा निकुंभ उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी लाभार्थ्यांशी संवाद साधला. तसेच शासनाच्या विविध स्वयंरोजगार व आर्थिक सक्षमीकरण योजनांचा लाभ घेऊन उद्योग-व्यवसाय उभारण्याचे आवाहन केले.

# सत्कार हा केवळ गौरव नसून भविष्यात मोठी स्वप्ने पूर्ण करण्यासाठी प्रेरणा - आ. सुलभा खोडके

### दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार; दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त जनसेवा सप्ताहांतर्गत प्रेरणादायी उपक्रम

प्रतिनिधी २७ जुलै

**अमरावती:** शिक्षण हेच विकासाचे माध्यम असून शिक्षणाशिवाय माणूस प्रगती करू शकत नाही. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनात दहावी आणि बारावीचा टप्पा हा विद्यार्थ्यांच्या जीवनाला नवी दिशा व भविष्याचा वेध घेऊन नवे क्षितिजे गाठण्याची प्रेरणा देणारा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मिळविलेले सुयश हे त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनत, शिस्त आणि जिद्दीचे फळ असले तरी त्यांचा सत्कार करून त्यांना अधिक प्रोत्साहित करणे हे समाजाचे कर्तव्य आहे. आजचा सत्कार हा केवळ गौरव नसून विद्यार्थ्यांना भविष्यात आणखी मोठी स्वप्ने पूर्ण करण्यासाठी प्रेरणा देणारा आहे. शिक्षण हाच विकासाचा व समृद्ध जीवनाचा पाया असून शिक्षणाच्या माध्यमातून समाज आणि राष्ट्राच्या विकासात योगदान देण्याचा संकल्प प्रत्येक विद्यार्थ्याने करावा. असे आवाहन आमदार सुलभा संजय खोडके यांनी केले.




दिवंगत उपमुख्यमंत्री तथा लोकनेते अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित "जनसेवा सप्ताह" उपक्रमांतर्गत शोध प्रतिष्ठान,अमरावतीच्या वतीने दहावी व बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा आज रविवार दिनांक २६ जुलै रोजी श्री. संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, मोर्शी रोड, अमरावती येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात आ.सौ. सुलभाताई खोडके यांच्या हस्ते इयत्ता दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा यथोचित सत्कार करून गुणगौरव करण्यात आला. शोध प्रतिष्ठानचे अध्यक्ष- यश खोडके यांच्या संकल्पनेतून आयोजित या कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यशवंत - गुणवंत विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाचे रूपांतर एका भव्य विद्यार्थी महामेळाव्यात झाले. कार्यक्रमाला विधानपरिषद आमदार - संजय खोडके, शोध प्रतिष्ठान,अमरावतीचे अध्यक्ष - यश खोडके, प्रसिद्ध वक्ते श्री. अनिरुद्धजी पाटील, मनपा स्थायी समिती सभापती - अविनाश मार्डीकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष- प्रशांत डवरे , माजी महापौर -अँड. किशोर शेळके, स्वीकृत नगरसेवक- भोजराज काळे, राज्य शिक्षक संघाचे- दिलीप कडू, महिला बाल कल्याण सभापती - सौ. ममता आवारे,मनपा नगरसेवक - चंद्रकांत उर्फ चंदू खेडकर, प्रशांत उर्फ गुड्डू धर्माळे, प्रमोद महल्ले, मनीष बजाज, मंगेश मनोहरे , सौ. मीनल योगेश सवाई , सौ. अर्चना मनीष पाटील,आदी मान्यवर व्यासपीठावर विराजमान होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते माता सरस्वती व दिवंगत लोकनेता - अजितदादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. तसेच सर्वांनी अजितदादांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून दोन मिनिटे मौन बाळगून श्रद्धांजली वाहिली.

पुढे बोलतांना आमदार सौ सुलभाताई खोडके म्हणाल्या कि, निसर्गाने मानवाला पुष्कळ काही दिले आहे. त्यामुळे आपलेही निसर्गाप्रती काही देणे लागते. आज बदलत्या वातावरण व ऋतुमानामुळे निसर्ग चक्र बाधित झाले आहे. पर्यावरणाचा समतोल अबाधित राखायचा असेल तर वसुंधरेवर हरित सृष्टी साकारणे काळाची गरज आहे. म्हणून आजच्या पिढीने वृक्षारोपणाची विधायक चळवळ हाती घेऊन शुद्ध प्राणवायू निर्मितीचा संकल्प करण्याचे आवाहन सुद्धा आमदार महोदयांच्या वतीने करण्यात आले.

कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून लाभलेले श्री. अनिरुद्ध पाटील यांनी आपल्या प्रेरणादायी मनोगतातून विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी शिस्त, संयम, संस्कार आणि सेवाभाव यांचे अनन्यसाधारण महत्त्व पटवून दिले. शिक्षणासोबतच उत्तम चारित्र्य, सकारात्मक विचार आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी या गुणांच्या जोपासनेतूनच खरे यश प्राप्त होते, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून सातत्यपूर्ण परिश्रम, वेळेचे योग्य नियोजन आणि आत्मविश्वासाच्या बळावर प्रत्येक आव्हानाला सामोरे जावे, असा यावेळी विद्यार्थ्यांना मोलाचा सल्लाही त्यांनी दिला.

## वृक्षारोपणातूनच हरित, समृद्ध आणि सुरक्षित भविष्य घडेल- आ. प्रविण पोटे पाटील

### मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त शेकडो झाडांचे वृक्षारोपण

प्रतिनिधी २७ जुलै

**अमरावती** मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा दशक अभियान अंतर्गत आमदार प्रविण पोटे पाटील यांच्या नेतृत्वाखाली रिंग रोड, पोटे पाटील रोड, कठोरा परिसरात वड व पिंपळ या पर्यावरणदृष्ट्या महत्त्वपूर्ण वृक्षांचे वृक्षारोपण उत्साहात संपन्न झाले.



यावेळी बोलताना आमदार प्रविण पोटे पाटील म्हणाले, "वृक्षारोपण ही केवळ एक औपचारिकता नसून भावी पिढ्यांसाठी आपण ठेवत असलेली अमूल्य ठेव आहे. वड आणि पिंपळ यांसारखे वृक्ष पर्यावरणाचा समतोल राखण्याबरोबरच भारतीय संस्कृतीचे प्रतीक आहेत.

वृक्षारोपणातूनच हरित, समृद्ध आणि सुरक्षित भविष्य घडेल त्यामुळे प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला, तर हरित, प्रदूषणमुक्त आणि समृद्ध महाराष्ट्र घडविणे शक्य होईल."

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत शेकडो वृक्षांची लागवड करण्यात आली. "एक झाड... एक जबाबदारी" या संकल्पनेतून उपस्थितांनी वृक्षसंवर्धनाची शपथ घेतली. वृक्षारोपणाबरोबरच त्यांचे नियमित संगोपन व संरक्षण करण्याचाही निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

या प्रसंगी आ. राजेश वानखडे, जयंत डेहनकर, शिवराय कुळकर्णी, चेतन पवार, नितीन गुडधे तसेच परिसरातील नागरिक, भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिदी येथे जुगार रेडमध्ये 11 लाखाच्या मुददेमालासह 11 आरोपी ताब्यात

प्रतिनिधी २७ जुलै

**अंजनगाव:** शिदी येथे जुगार रेड मध्ये ४ मोटर सायकल, एक चारचाकी वाहन तसेच नगदि २५,८०० रुपये असा एकुण ११,७९,३५० रुपये चे मुददेमालासह ११ आरोपी ताब्यात घेतले आहे. ही कारवाई पथ्रोट पोलीसांनी केली.



पोलीस अधिक्ष यांनी चोरुन लपुन अवैध धंदे करणारे इसमांवर मोठ्या प्रमाणात कार्यवाही करण्याबाबत सुचना दिलेल्या आहे. दिनांक 25 जुलै रोजी गोपनिय माहीती मिळाली कि शिंदी येथे मोहम्मद साजीद शेख कलीम रा. वार्ड नं ३ इंदिरा नगर हा आपले घरामध्ये जुगार भरवत आहे. अशा माहीतीवरुन आम्ही व सोबत पोलीस स्टेशन येथिल पोलीस स्टाफ व पंच असे ग्राम शिंदी येथे जावुन पंचाचे उपस्थितीत रेड केली असता आरोपी मोहम्मद साजीद शेख कलीम, वय ३३ वर्ष रा. वार्ड नं ३ इंदिरा नगर शिंदी, सैयद ईकबाल सैयद अनिस, वय ३० वर्ष रा. शिदी,शेख नाझीम शेख नझीर वय ५३ वर्ष रा. शिंदी, प्रफुल्ल रामा वानखडे, वय ३५ वर्ष रा. शिदी, गणेश सहदेवराव बरडे, वय ४५ वर्ष रा. जवळापुर, प्रशांत महादेवराव राहाटे, वय ३८ वर्ष रा. शिंदी, सिध्दार्थ वासुदेव बरडे, वय ३८ वर्ष रा.जवलापुर, अमर रवि लिल्हारे, वय २८ वर्ष रा. जवलापुर, गणेश मधुकर कुरवाळे, वय ४६ वर्ष रा. पथ्रोट, ओप्रकाश देविदास उईके, वय ३६ वर्ष रा. पथ्रोट, अंकुश रमेश रेपाडे, वय ३८ वर्ष रा.कुष्ठा सर्व ता. अचलपुर जि. अमरावती असें जुगार खेळतांना मिळुन आले आहे. वरुन त्यांचे तांब्यतुन ४ मो सा कि अं ३,२०,००० रुपये व एक चारचाकी गाडीं कि अं ७,५०,००० रूपये असा एकुण किंमत १०,७०,००० रुपये चा मुददेमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आलेला आहे. तसेच पंचासमक्ष वरील नमुद आरोपी, ४ मोटार सायकल किंमत अंदाजे ३,२०,००० रुपये एक चारचाकी गाडौ कि अं ७,५०,००० रुपये, ४ अॅड्राईड मोबाईल कि अं ७५,००० रुपये एक साधा किपॅड मोबाईल कि अं ५०० रुपये, व डावावरील तसेच अंगझडतीतुन एकुण २५,८०० रुपये व ५२ ताश पत्ते कि अं ५० रुपये असा ११,७१,३५० रुपये चा मुददेमाल ताब्यात घेतला.

## आ. प्रविण पोटे जनसंपर्क कार्यालयात पंतप्रधान नरेंद्र मोदींची 'मन की बात'

### "सेवादशक" अभियान अंतर्गत कार्यक्रमाचे आयोजन

प्रतिनिधी २७ जुलै

**अमरावती :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रिय 'मन की बात' कार्यक्रमाचे थेट प्रसारण आज आ. प्रविण पोटे पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालय येथे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाला भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना 'कॅच द रेन' अभियानांतर्गत पावसाच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करण्याचे आणि वृक्षारोपणाला लोकचळवळीचे स्वरूप देण्याचे आवाहन केले. तसेच स्थानिक कारागीर, महिला उद्योजक आणि लघुउद्योजकांना प्रोत्साहन देत 'आत्मनिर्भर भारत' अधिक सक्षम करण्याचा संदेश दिला. याशिवाय तंत्रज्ञान, क्रीडा आणि स्टार्टअप्सच्या माध्यमातून देशाचे नाव जागतिक स्तरावर उज्ज्वल करणाऱ्या युवा पिढीचे कौतुक करत त्यांनी नव्या भारताच्या निर्मितीत युवकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले. स्वच्छता ही केवळ मोहीम नसून ती प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनली पाहिजे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. या कार्यक्रमाला खासदार डॉ. अनिलजी बोंडे, अॅड. प्रशांत देशपांडे, नगरसेवक आशिष अतकरे, नितीन गुडदे, सौ. संगीताताई शिंदे, चेतन पवार, नगरसेविका लताताई देशमुख, कॉटन मार्केट मंडळाचे अध्यक्ष सचिन नाईक, बूथ प्रमुख कपिल खंडारे, शक्तीकेंद्र प्रमुख शैलेंद्र मिश्रा, मंगेश खोंडे तसेच भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पावसाच्या खंडात सोयाबीन उत्पादकांनी घाबरू नये; कृषी संशोधन केंद्राचा सल्ला

**अमरावती:** जिल्ह्यात जून अखेरीस पेरणी झालेल्या सोयाबीन पिकाची अवस्था सध्या 12 ते 15 दिवसांची असून, गेल्या 5 ते 6 दिवसांपासून पावसाने ओढ दिली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी बांधवांनी घाबरून न जाता, कोणत्याही महागड्या फवारण्या न करण्याचे आवाहन अमरावती प्रादेशिक संशोधन केंद्र ( डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ) मार्फत कळविण्यात आले आहे.

या संवेदनशील काळात जमिनीतील ओलावा टिकवणे आणि मुळांची वाढ चांगली ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जमीन वाफशावर असल्यास शेतकऱ्यांनी उथळ डवरणी व कोळपणी करावी; ज्यामुळे वरचा पापुद्रा फुटून तणांचे नियंत्रण होईल आणि जमिनीतील ओलावा टिकून राहील. संरक्षित सिंचनाची सोय असल्यास व रोपे दुपारी कोमेजू लागल्यास हलके स्प्रिंकलर सिंचन द्यावे. 3-4 दिवसांच्या खंडासाठी टॉनिक किंवा 19:19:19 ची गरज नाही, मात्र पाण्याचा ताण 7 ते 10 दिवसांपेक्षा वाढल्यास 1 टक्के पोटॅशियम नायट्रेट किंवा 19:19:19 ची सकाळी किंवा संध्याकाळी फवारणी करावी. तीव्र ताण व जास्त तापमान असताना तणनाशकांचा वापर टाळावा.

दुसरीकडे, ज्या भागात अत्यल्प पावसामुळे अद्याप पेरणी झालेली नाही, तिथे उशिरात उशिरा 23 जुलैपर्यंत सोयाबीन पेरता येईल. मात्र, यामुळे उत्पादनात 15 ते 20 टक्के घट होऊ शकते. अशा वेळी जे एस 20-34, जे एस 95-60, पिडीकेव्ही अंबा, एमएयूएस 725 यांसारख्या लवकर येणाऱ्या वाणांची निवड करावी. हेक्टरी रोपांची संख्या राखण्यासाठी दोन ओळींत 30 से.मी. अंतर ठेवून, बियाणे दर वाढवावा आणि पेरणी बीबीएफ किंवा पट्टा पद्धतीनेच करावी.

## मेळघाटात पुन्हा सावलीखेडा आश्रम शाळेत विषबाधा! आदिवासी मुलांचे जीव धोक्यात

### टीटांबा, बीजुधावडी, नंतर सावलीखेडा आश्रम शाळेत खळबळ!

प्रतिनिधी २७ जुलै

**अमरावती :** रात्रीच्या जेवणानंतर 20 आदिवासी विद्यार्थ्यांना पोटदुखी, मळमळ, ओकारी.

टीटांबा-विषबाधेनंतर आता सावलीखेडा/बीजुधावडी मध्येही हाच प्रकार घडला आहे. प्रशासन अलर्ट मोडवर सहा. जिल्हाधिकारी सिद्धार्थ शुक्ला यांनी आश्रम शाळेला भेट दिली.

"घाबरू नका, सर्वांवर लक्ष आहे" - असं आश्वासन. धारणीहून रुग्णवाहिका + औषधसाठा घटनास्थळी दाखल झाला आहे. आदिवासी मंत्री डॉ. अशोक उईके स्वतः धारणी-टीटांबा दौऱ्यावर असताना देखील ही दुसरी घटना घडली आहे. हे विशेष!



## प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी 31 जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती:** केंद्र शासनाच्या महिला व बालविकास विभागामार्फत देण्यात येणाऱ्या 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार 2026' साठी पात्र बालकांकडून अर्ज मागविण्यात येत असल्याची माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय गट यांनी दिली आहे. कला, संस्कृती, शिक्षण, खेळ, नाविन्यपूर्ण शोध, सामाजिक कार्य आणि शौर्य या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय व विशेष कामगिरी करणाऱ्या 5 ते 18 वर्षे वयोगटातील बालकांना हा राष्ट्रीय स्तरावरील सर्वोच्च पुरस्कार प्रदान केला जातो. या पुरस्कारासाठी पात्र ठरणाऱ्या इच्छुक विद्यार्थ्यांनी किंवा त्यांच्या वतीने पालक, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी तसेच जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय यांच्यामार्फत आपले प्रस्ताव दि. 31 जुलै 2026 पूर्वी https://awards.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने सादर करणे आवश्यक आहे. लाभ घेऊन आपले अर्ज मुदतीत सादर करावेत, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## रुक्मिणीच्या माहेर असलेल्या कौंडण्यापूरमध्ये आषाढी एकादशीनिमित्त भक्तीचा महासागर, भाविकांची मोठी गर्दी

प्रतिनिधी २७ जुलै

**अमरावती:** आषाढी एकादशी हा वारकरी संप्रदायासाठी भक्तीचा महाकुंभ मानला जातो. पंढरपूरच्या वारीसोबतच विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील वर्धा नदीच्या पवित्र तीरावर वसलेले रुक्मिणी मातेचे माहेर म्हणून प्रसिद्ध असलेले कौंडण्यापूरही आज भक्तीमय झाले आहे. विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली असून संपूर्ण परिसर विठ्ठल



नामाच्या जयघोषाने दुमदुमून गेला आहे. हरिनाम सप्ताह, भजन, कीर्तन आणि विविध धार्मिक कार्यक्रमांमुळे कौंडण्यापूर नगरीत उत्साहाचे वातावरण आहे. आषाढी एकादशीच्या निमित्ताने येथे येणाऱ्या वारकऱ्यांमुळे या ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळाचे भक्तीमय रूप भाविकांना बघायला मिळाले.

## विभागीय आयुक्तालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना अभिवादन

**अमरावती:** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंती निमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात आज अपर आयुक्त सुरज वाघमारे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रनिर्मितीतील योगदानाला अभिवादन करत त्यांच्या विचारांचा जागर करण्यात आला. यावेळी उपायुक्त संतोष कवडे, सहायक आयुक्त वैशाली पाथरे , नायब तहसीलदार श्यामसुंदर देशमुख यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी आदी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्य व स्व.अजीतदादा पवार यांच्या जयंतीनिमित्य 25 हजारपेक्षा जास्त वृक्षारोपण

### भातकुली येथील आदर्श प्रायमरी स्कुल येथील परीसरात सुनिल राणा यांच्या हस्ते वृक्षारोपन

प्रतिनिधी २७ जुलै

**अमरावती :** मुख्यमंत्री तथा लोकनेते देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आणि स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त संपूर्ण अमरावती जिल्ह्यात २५ हजारांहून अधिक वृक्षारोपण करण्याचा संकल्प भाजपा नेत्या तथा माजी खासदार नवनित राणा यांनी केला आहे. या संकल्पाच्या अनुषंगाने भातकुली येथील आदर्श प्रायमरी स्कूलच्या परिसरात सुनिल राणा यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.



आदर्श प्रायमरी स्कूलचे संचालक हर्षद वाचासुंदर यांच्या विशेष पुढाकारातून आयोजित या उपक्रमात शाळेच्या परिसरात सुमारे ३०० ते ४०० विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धन, हरित परिसर निर्मिती आणि भावी पिढीमध्ये वृक्षसंवर्धनाची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी बोलताना सुनिल राणा यांनी वृक्षारोपण ही केवळ औपचारिकता नसून सामाजिक जबाबदारी असल्याचे सांगितले. प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केल्यास पर्यावरण संरक्षणासाठी मोठे योगदान मिळेल, असे त्यांनी नमूद केले. तसेच माजी खासदार नवनित राणा यांनी दिलेल्या २५ हजार वृक्षारोपणाच्या संकल्पाला जनतेने उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन हरित अमरावती घडविण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

या वृक्षारोपण उपक्रमात युवा स्वाभिमान पार्टी जिल्हाअध्यक्ष प्रकाश साबळे, नगरसेवक प्रशांत वानखडे, YSP तालुका अध्यक्ष मंगेश इंगोले, राहुल तायडे, शेखर अवघड, संजय भुत, संजय चुनकीकर, राजु चुनकीकर, शाळेचे शिक्षक, विद्यार्थी, पालक, स्थानिक नागरिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

सोमवार, दि. २७ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com




वस्तीगृहाच्या नावावर कोट्यवधीची लुबाडणूक...
शासकीय जागेवर अनाधिकृत बांधकाम करून अतिक्रमण
शासकीय जागेवर अतिक्रमण, जिल्हाधिकाऱ्यांनी करावे भ्रमण !
* वस्तीगृहाच्या नावावर अनुदान लूटले, आता पुन्हा बांधकाम करीत सुटले
अतिक्रमण गरीबांचे काढतात, श्रीमंतांचे सोडतात !
गरीब, श्रीमंत असा भेदभाव करतात
शासकीय जागेवर अतिक्रमण, जिल्हाधिकाऱ्यांनी करावे भ्रमण...
वस्तीगृहाच्या नावावर कोट्यवधीची फसवणूक
* चौकशी करून गुन्हे दाखल करा ; अन्यथा आंदोलन * सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हडे पाटील यांचा इशारा
नियमाला हरताळ, कारवाईस टाळाटाळ!
* राजस्थान कॉलेजच्या अतिक्रमणाबाबत महसूल प्रशासनाचे 'मौनव्रत'
* सरकारी जागेतील गरीबांचे झोपडे पाडते, पण धनदांडग्यांचे कायम ठेवते
* संघर्षी सुभाष देवडे पाटील यांचा १३ वर्षापासून शासनाकडे पाठपुरावा
सिध्द झाली गुन्हेगारी, दाखल करा फौजदारी !
अतिक्रमणीत जागेत पैसे लाटण्याचा उपक्रम, 'त्या' संस्थेत घोटाळयाचा पराक्रम !
डोक लावल 'संस्थाध्यक्ष' गड्याने, शासनाची जागा शासनाला भाड्याने !
* भाडे पट्टा रद्द करा, शासनाची जागा परत घ्या, संबंधितांवर गुन्हे दाखल करा

## शासकीय जागेवर अतिक्रमण, जिल्हाकाऱ्यांनी करावे भ्रमण...

# अनियमिततेची हद्द, भाडेपट्टा करा रद्द !

## * सिध्द झाली गुन्हेगारी, दाखल करा फौजदारी * संस्थाध्यक्ष लयभारी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

**येथील राजस्थान शिक्षण संस्थेने शासकीय जागेवर अतिक्रमण करून अवैध रित्या वस्तीगृह बांधले. व शासनाचे कोट्यवधीचे अनुदान हडप केले. आता चोरावर मोर होत या संस्था अध्यक्षांनी शासनाचीच जागा शासनाला म्हणजे वैद्यकीय महाविद्यालयाच्या मुलींच्या वस्तीगृहाला भाड्याने देवून पैसे लुटण्याचा धंदा सुरू केला. मुलींच्या वसतीगृहाची ईमारत बेकायदेशीर बांधल्या प्रकरणी 'या' संस्थेतील गैरकारभार चव्हाट्यावर आला आहे. शासनाने त्या वादग्रस्त जागेचा नमूना 'ड' चार वर्षापुर्वीच रद्द केला आहे.**


हाच तो नमुना 'ड'




तरीपण राजस्थान शिक्षण संस्थेचे विद्यमान अध्यक्ष ठाकूरदास मालाणी व त्यांच्या कार्यकारिणीतील उच्चशिक्षीत आणि फक्त सह्याजीराव असलेल्या संचालक मंडळाने 'ती' वादग्रस्त मुलींच्या वसतीगृहाची जागा वाशीम येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील मुलींच्या वसतीगृहासाठी भाड्याने दिल्याचा पराक्रम केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे.आधीच या संस्थेचे माजी सचिव,कार्याध्यक्ष आणि सह्याचे अधिकार असलेले राजेंद्र सोमाणी यांच्या कार्यकाळातील अनेक घोटाळे झाल्यामुळेच त्यांची विद्यमान संचालक मंडळातून हकालपट्टी करण्यात आली आहे.सोमाणींचा कित्ता मालाणींनी घडविल्यामुळे 'या' संस्थेच्या मागील २० वर्षातील आर्थिक व्यवहारासह संचालक मंडळाने घेतलेल्या सर्व ठरावाची शासनाने सखोल चौकशी करण्याची मागणी केल्या जात आहे.

येथील राजस्थान शिक्षण मंडळाद्वारे संचालीत राजस्थान आर्य कला,मि.क. वाणिज्य आणि स.रा.राठी विज्ञान महाविद्यालय,वाशीम तसेच रामकृष्णजी राठी विधी महाविद्यालयातील मुलींच्या वसतीगृहासाठी जवाहर नवोदय विद्यालयाजवळ असलेल्या शासकीय जागेवर अतिक्रमण करून त्या जागेवर विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळालेल्या कोट्यवधीच्या निधीतून मुलींच्या वसतीगृहाची टोलेजंग ईमारत बांधली.हे बांधकाम तत्कालीन कर्तेधर्ते आणि कमिशन खाण्यात पटाईत असलेल्या कारभारी राजेंद्र सोमाणी यांच्या अधिपत्याखाली झाल्याचे सर्वश्रृत आहे. उल्लेखनिय म्हणजे या वसतीगृहाचे बांधकाम झाले तेव्हापासून या वसतीगृहात राजस्थान महाविद्यालयातील एकही मुलगी त्या वसतीगृहात राहिली नसल्याची बाबही जगजाहिर आहे.पैशासाठी काहीही करणाऱ्या लालची सोमाणींनी या मुलींच्या वसतीगृहात शासकीय ,खासगी सेवेत असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना भाडेतत्वावर खोल्या दिल्याचीही बाब यापुर्वीच सामाजिक कार्यकर्ते सुभाष देवढे पाटील यांनी उघडकीस आणली होती.देवढे यांनी शासनासह वाशीमच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे 'या' वादग्रस्त अतिक्रमीत जागेसंदर्भात पुराव्यासह तक्रारी देवून सर्व दोषींवर फौजदारी कारवाई करून ती वादग्रस्त जागा शासनाने ताब्यात घेण्यासाठी पाठपुरावा केला आहे.अद्यापही देवढे यांचा पाठपुरावा सुरूच असून जिल्हाप्रशासनाने मौनव्रत धारण करून राजस्थान शिक्षण मंडळातील आजी-माजी संचालकांना 'आश्रय' दिल्याची चर्चा आहे.म्हणूनच या संस्थेचे विद्यमान अध्यक्ष ठाकूरदास मालाणी यांनी व त्यांच्या सहकारी संचालकांनी शासकीय जागेवर अतिक्रमण करुन संस्थेने बेकायदेशीर बांधकाम केलेल्या मुलींच्या वसतीगृहाची ईमारत वाशीमच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील मुलींच्या वसतीगृहासाठी भाड्याने दिल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. शासनाने राजस्थान शिक्षण मंडळ,वाशीम च्या मागील २० वर्षातील सर्व आर्थिक व्यवहाराची आणि आजी-माजी संचालक मंडळाने घेतलेल्या सर्व ठरावाची वरिष्ठ सनदी अधिकाऱ्या मार्फत चौकशी करून या घोटाळ्यात व भ्रष्टाचारात सहभागी असलेल्या सर्व दोषींविरूद्ध फौजदारी कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते सुभाष देवढे यांनी केली आहे.

### 'डीन'ची नितिमत्ताही झाली हिन...

शासनाला कोणतीही खासगी जागा भाडेतत्वावर घ्यायची असेल तर त्या जागेच्या मालकीहक्कासह,बांधकामाची परवानगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र,जागेचा नमूना 'ड' अशा विविध आवश्यक कागदपत्राची शहानिशा केल्यानंतरच त्या जागेचा भाडेकरार केल्या जातो.मात्र,वाशीम शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या 'डीन' यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील मुलींच्या वसतीगृहासाठी राजस्थान महाविद्यालयाने शासकीय जागेवर बेकायदेशीर बांधकाम केलेल्या मुलींच्या वसतीगृहाची ईमारत भाडेतत्वावर घेतांना स्वत:चा आर्थिक लाभ होण्यासाठी 'त्या' वादग्रस्त जागेचा भाडेकरार करून लाभार्थी होण्याचा बहुमान पटकावल्याची शिक्षण वर्तुळात चर्चा आहे.

## थोडक्यात

### कारंजा बस स्थानकाजवळ अवैद्य प्रवासी वाहतूक वर कारवाई



● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

कारंजा शहराच्या बसस्थानकाजवळ व परिसरात मोठ्या प्रमाणात अमरावती अकोला अवैद्य लक्झरीची प्रवासी वाहतूक सुरू असून एजंट बस स्थानकामध्ये येऊन दादागिरी करून फलाटावरून प्रवासी नेत असल्याबाबतचे वृत्त सिटी न्यूज सुपरफास्ट मध्ये प्रकाशित केले होते. या वृत्ताची दखल घेत वाशिम आर.टी.ओ.विभागाने कारंजा बस स्थानक व परिसरात अवैद्य प्रवासी वाहतूक करणाऱ्या वर कारवाई करून ६२ हजार रुपये दंड वसूल केला.

बसस्थानक परिसरात अवैध वाहतुक करणारे वाहने बसस्थानकाच्या प्रवेशद्वारावर उभी करतात. येऊन मोठ्याने ओरडून प्रवाशांना बोलावून नेतात. दि. १७/७/२६ शुक्रवारला सांयकाळी अंदाज ५:३० च्या दरम्यान हम्मू भाई लक्झरी ऐजर अकोला फलाटावर येऊन प्रवाशाना नेतांना आठळले तेव्हा बसस्थानक प्रमुख सौ.ग. उ.आंबटपुरे यांनी प्रवासी नेण्यास अडकाव केला तेव्हा त्यांनी माझ्याशी वाद-विवाद केला मी त्यांला बसस्थानका बाहेर जाण्यास सांगितले.तेव्हा ते जात नव्हते मी त्यांना जबरदस्तीने बाहेर काढले. तेव्हा त्यांनी माझ्यावर हात उचलला व लोटा लाटी केली.युसुफ सफाई कामगार, सुरज राठोड, वाहतुक नियंत्रक, फिरते परवाना धारक अन्नु मुन्नीवाले यांच्यासमोर वरिल प्रकार घडला.साहेब आपणास विनंती आहे की माझ्या जिवाला धोका आहे.या एजंट बाबत तक्रार घेऊन सुद्धा ती कारवाई होत नाही.त्यामुळे त्यांना अभय मिळाले आहे. बस स्थानकाच्या २०० मीटर अंतराच्या परिसरात अवैध वाहतूक बंदी असूनही कारंजा शहराच्या बस स्थानका जवळ ही प्रवासी अवध्य वाहतूक सुरू आहे. तरी संबंधितावर कारवाई करावी असे या तक्रारी मध्ये म्हटले आहे.अवैद्य प्रवासी वाहतुकावर कारवाई झाल्याबद्दल बस स्थानक प्रमुख सौ.गंगा आंबट पुरे यांनी सिटी न्यूज सुपरफास्ट चे धन आभार मानले.

## नाही उत्पादन तिथी, मग एक्सपायरी कधी...

# लेमन सोडा ठरतोय घातक, प्रशासनाला नाही सोयरसुतक!

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यातील शेलुबाजार येथे उत्पादीत होणारा कथित लेमन सोडा प्रकरण आता 'शाही' थाटात गाजत आहे. कारण या उत्पादन कंपनीचा मालक कुणीतरी 'शहा' असल्याने अन्न व औषध प्रशासन विभाग झोपेचे सोंग घेऊन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. परिणामी बाजारात विकल्या जात असलेल्या बाटलीवर उत्पादन तारीखच नाही, तर एक्सपायरी कधी? हा कळीचा मुद्दा उपस्थित होत आहे. ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे. तरीही सबंधित प्रशासनाला याचे काहीही सोयरसूतक नाही असे अपरोधाने लोकं बोलत आहेत.






शेलुबाजार येथील STRESSCURE सॉफ्ट ड्रिंक्स अँड मिनरल वॉटर प्रा.ली. कंपनीच्या लेमन सोडा बाटलीवर उत्पादन तारीख, बॅच नंबर आणि किरकोळ विक्री किंमत नसल्याचे उघड झाले आहे. सदर लेमन सोड्याच्या बाटलीवर ' SEE BOTTLER NECK/CAP असा उल्लेख आहे, मात्र त्या ठिकाणीही कोणतीही माहिती छापलेली नाही.' Best Before 3 Months from the date of mfg ' असं लिहिलं असलं तरी उत्पादन तारीखच नसल्याने एक्सपायरी कधी हे ग्राहकांना कळणार कसं ? हा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे.

या बाबत सिटीन्यूज सुपरफास्टने सातत्याने पाठपुरावा केला आहे. मात्र अन्न व औषध प्रशासन विभाग वाशिम या गंभीर प्रकरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप सर्व सामान्य नागरिक करत असून कुठतरी पाणी मुरत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यानिमित्ताने अन्न सुरक्षा नियमांनुसार उत्पादन तारीख, बॅच नंबर बंधनकारक असताना अन्न व औषध प्रशासन विभाग वाशिम का गप्प आहे ? हा कळीचा मुद्दा उपस्थित होत आहे.

**प्रशासनाला नाही ताळमेळ, ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ...**

अन्न सुरक्षा नियमांनुसार कोणत्याही खाद्य पदार्थांच्या पॅकिंगजवर तसेच कुठल्याही पेयाच्या बाटलीवर उत्पादन तारीख, बॅच नंबर लिहिणे बंधनकारक आहे. या नियमाचे काटेकोर पालन करणे हे सबंधित कंपनीचे आद्य कर्तव्य आहे. मात्र शेलुबाजार येथे उत्पादीत होणाऱ्या कथित लेमन सोड्याच्या बाटल्यांवर सदर माहिती आढळत नाही.परिणामी एक्सपायरी बद्दल सविस्तर माहितीच नसल्याने जुना स्टॉक विकला जातोय का हे पाहणे खुप गरजेचे आहे. पण सबंधित प्रशासनाच्या अर्थपूर्ण संबंधातून या गंभीर प्रकरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष तर केले जात नाही ना ! हे पाहणे सुद्धा तितकेच महत्वाचे आहे. अन्यथा ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ सर्रास सुरू राहणार आहे.


मंगळवार, दि. २१ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
लेमन सोडा बाटलीवर नाही एक्सपायरी डेट, कारवाई करा थेट !
*शेलुबाजार येथील अक्षम्य प्रकार *अन्न व औषध प्रशासन काय कारवाई करणार ?
बुधवार, दि. २२ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
पॅकिंगवर नाही उत्पादन तिथी, ग्राहकांच्या आरोग्याची माती !
गुरूवार, दि. २३ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
नियम - कायदा धाब्यावर, लेमन सोडा देशी दारूच्या गुत्त्यावर !
शेलुबाजार येथील 'त्या' लेमन सोड्याची विक्री सुरूच...
शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
नियमांची होतंय पायमल्ली, प्रशासनाची उडवली खिल्ली !

## शिरपूर जैन येथे भीषण आग, तीन दुकाने जळून खाक !

**घटनेत लाखोंचे नुकसान, मालेगाव नगरपंचायतची अग्निशमन यंत्रणा ठरली कुचकामी**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



वाशिमचे शिरपूर मध्ये रात्री दरम्यान भीषण आग लागून तीन ते चार दुकाने जळून खाक झाल्याची धक्कादायक घटना घडली या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी,मात्र या आगीमध्ये लाखोंचे नुकसान झाले असून अचानक लागलेल्या आगीमुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती. वाशिमच्या शिरपूरमध्ये मध्यरात्री भीषण आग लागून तीन ते चार दुकाने जळून खाक झाल्याची घटना घडली .पहाटे तीन वाजताच्या सुमारास लागलेल्या या आगीत दुकानांचे लाखोंचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. घटनेची माहिती मिळताच शिरपूर पोलीस स्टेशनच्या ठाणेदार योगिता भारद्वाज आणि त्यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले .या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलीस आणि गावकऱ्यांनी पाण्याच्या सहाय्याने विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. मात्र, जवळच असलेल्या मालेगाव नगरपंचायतीची अग्निशमन यंत्रणा तब्बल एक तास उशिराने घटनास्थळी पोहोचल्याने नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.त्यामुळे मालेगांव नगर पंचायतच्या अग्निशमन यंत्रणावर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. नेमकी आग कशामुळे लागली हे अद्याप अस्पष्ट असले तरी सुदैवाने या आगीमध्ये कुठलीही जीवित हानी झाली नसून दुकानदारांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.या आगीमुळे परिसरात एकच खळबळ उडाल्याने काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

## ग्रामीण भूमिहीन महिला श्रमिकांच्या प्रश्नांवर संशोधन...

# प्रा. मंगेश भुताडे यांना आचार्य पदवी !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

स्थानिक श्री रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक मंगेश भुताडे यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अंतर्गत आचार्य (इप.ऊ.) पदवी संपादन केली आहे. गुलाम नबी आझाद समाजकार्य महाविद्यालय, पुसद येथील संशोधन केंद्रात दि. २४ जुलै रोजी प्रा. डॉ. अनंत देशमुख, प्रा. डॉ. संजय गवई यांच्या उपस्थितीत त्यांना पदवी बहाल करण्यात आली.



सामाजिक न्याय, महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण विकासाशी निगडित विषयावरील त्यांच्या संशोधनाला शैक्षणिक क्षेत्रातून विशेष दाद मिळत असून, त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.प्रा. भुताडे यांनी 'पश्चिम विदर्भातील ग्रामीण भूमिहीन महिला श्रमिकांचा विश्लेषणात्मक अभ्यास : आंतरछेदीय (Intersectional) दृष्टिकोन' या समाजाभिमुख विषयावर संशोधन पूर्ण केले आहे.

या संशोधन कार्यासाठी त्यांना गुलाम नबी आझाद समाजकार्य महाविद्यालय, पुसद येथील प्राचार्य तथा संशोधन मार्गदर्शक प्रा. डॉ. राजेश काळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रा. मंगेश भुताडे यांच्या संशोधनामुळे ग्रामीण भूमिहीन महिला श्रमिकांच्या प्रश्नांकडे नव्या दृष्टीकोनातून पाहण्यास चालना मिळेल, तसेच सामाजिक समता आणि न्यायाधिष्ठित विकासाच्या दिशेने धोरणात्मक निर्णय प्रक्रियेला बळ मिळेल, असा विश्वास शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील अभ्यासकांनी व्यक्त केला आहे.

## अन्न व औषध प्रशासनाचा वचक ओसरला...

# रिसोड तालुक्यात गुटखाकिंग जोमात, प्रशासन कोमात !

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

**अन्न व औषध प्रशासन विभागाची सूत्रे दबंग अधिकारी तुकाराम मुंढे यांच्याकडे आल्यानंतर भेसळयुक्त दूध आणि गुटखा विक्री कमालीची मंदावली होती. मात्र तो वचक हळू हळूहळू ओसरत गेल्याने रिसोड तालुक्यात पुन्हा गुटखाकिंग जोमात आणि अन्न व औषध प्रशासन विभाग कोमात गेल्याचे चित्र आहे. अवैध गुटख्याची राजधानी म्हणुन ओळखले जाणारे रिसोड तालुक्यात पुन्हा राजरोस गुटखा विक्री व पुरवठा सुरू झाला आहे. या गंभीर बाबीची सबंधित प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी अशी मागणी जोर धरत आहे.**




गुटखा बंदी का सिर्फ नाम, विक्री खुलेआम...
गुटख्याच्या रेड सिग्नला रिसोडात ग्रिन सिग्नल !


वाशीम Express
रिसोड, मालेगांवात अवैध गुटखा, स्थानिक पोलिस देत नाही कारवाईचा चटका!

व्यसन कोणतेही असो, त्याचा सर्वाधिक घातक परिणाम देशाच्या उज्ज्वल भविष्यावर म्हणजेच तरुण पिढीवर होत असतो. रिसोड शहर व तालुक्यात गेल्या वर्षभरापासून अवैध गुटख्याचा वाढता सुळसुळाट चिंतेचा विषय बनला आहे. या व्यसनामुळे अनेक युवक गंभीर आजारांच्या, विशेषतः कर्करोगासारख्या जीवघेण्या आजारांच्या विळख्यात सापडण्याचा धोका वाढत आहे. मात्र, या गंभीर प्रश्नाकडे संबंधित यंत्रणा दुर्लक्ष करत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये होत आहे. गेल्या वर्षी तत्कालीन पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली सोनार गल्ली परिसरातील एका गोदामातून सुमारे एक ते दोन कोटी रुपयांचा अवैध गुटखा जप्त करण्यात आला होता. त्या कारवाईची जिल्हाभर मोठी चर्चा झाली होती. त्यानंतर काही काळ गुटखा विक्रीला आळा बसल्याचे चित्र दिसले; मात्र आता पुन्हा हे जाळे पूर्वीप्रमाणे सक्रिय झाल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.शहरापुरता मर्यादित न राहता तालुक्यातील अनेक गावांमध्ये अवैध गुटखा पोहोचविला जात असल्याची चर्चा आहे. काही ठिकाणी मोटारसायकलवरून खुलेआम गुटखा पुरवठा होत असल्याचे नागरिक सांगतात. यामुळे संबंधित यंत्रणांच्या कार्यक्षमतेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.विशेष चिंतेची बाब म्हणजे काही शाळांच्या परिसरातील किराणा किंवा गोळ्या-बिस्किटांच्या दुकानांतही गुटखा सहज उपलब्ध होत असल्याचे पालकांचे म्हणणे आहे.


विद्यार्थ्यांपर्यंत अशा व्यसनाधीन वस्तू सहज पोहोचत असल्याने पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.रिसोडचे उपविभागीय पोलीस अधिकारी नवदीप अग्रवाल यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अवैध धंद्यांवर कठोर कारवाया करून कडक प्रशासनाची छाप निर्माण केली होती. त्यामुळे काही काळ गुटखा विक्रेत्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पुन्हा वाढलेल्या अवैध गुटखा विक्रीच्या पार्श्वभूमीवर नागरिक आता नव्याने कठोर कारवाईची अपेक्षा व्यक्त करत आहेत. लोणी फाट्यावर तर ठोक व्यापाऱ्याकडून माल घेण्याकरिता सकाळी सहा ते आठ च्या दरम्यान शंभर मोटर सायकलची लाईन एका मोठ्या व्यापाऱ्याच्या घरासमोर लागलेली दिसून येते हेच मोटर सायकल वाले सकाळी खेड्यापाड्याला हा गुटका रोज पुरवितात व हजारो शाळकरी विद्यार्थ्यांना व्यसनाधीन बनवितात' नव्याने रुजू झालेले उपविभागीय पोलीस अधिकारी पवार साहेब करडी नजर गुटखा माफियांवर पडणार का?' हा प्रश्न सध्या पालक, सामाजिक कार्यकर्ते आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे.दरम्यान, अवैध तंबाखूजन्य पदार्थांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी असलेल्या अन्न व औषध प्रशासनानेही या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संयुक्त कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## नैसर्गिक शेती, सुरक्षित फवारणी आणि स्वच्छतेचा त्रिवेणी संगम !

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

रासायनिक शेतीच्या वाढत्या दुष्परिणामांच्या पार्श्वभूमीवर नैसर्गिक शेतीचा स्वीकार, सुरक्षित फवारणीची संस्कृती आणि स्वच्छतेची जनजागृती या तिन्हीही सुंदर घोटा येथे पाहायला मिळाला. संगमेश्वर शेतकरी गटाच्या पुढाकारातून आयोजित उपक्रमाने पर्यावरणपूरक शेती आणि सामाजिक जबाबदारीचा आदर्श निर्माण केला.

संगमेश्वर शेतकरी गटाच्या सदस्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने तब्बल १५ एकर क्षेत्रावर निंबोळी अर्काची फवारणी करून नैसर्गिक शेतीचा प्रभावी संदेश दिला. या फवारणीमागून नागरिकांमध्ये कोणताही गैरसमज निर्माण होऊ नये आणि प्रत्येक शेतकऱ्यांपर्यंत सुरक्षित फवारणीचे महत्व पोहोचावे, या उद्देशाने प्रत्येक प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले. यावेळी जनजागृती



फेरी काढण्यात आली. पुरुष सदस्यांनी घोषणाद्वारे आणि संवादातून ग्रामस्थांना रासायनिक शेतीवरील अवलंबित्व कमी करून पर्यावरणपूरक शेती पद्धती स्वीकारण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक कृषी अधिकारी संतोष आरू, पाणी फाउंडेशनचे मेंटर ए.पी. देशमुख, निमंत्रक किशोर मोरे, दिपक मापारी, यांनी उपस्थित राहून पुरुष शेतकऱ्यांना फवारणी किटचे वितरण केले. या उपक्रमात दिपक मापारी, बळीराम मोरे, किशोर मोरे, विजय मोरे, गणेश देशमुख, निलेश गोडघासे, किसन शेंडगे, संदिप अवचार, ज्ञानेशवर मोरे, संतोष सरनाईक, प्रशांत मोरे, यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

# घाटपुरी नाका मार्गावर खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका!

## वाहनधारक त्रस्त; तातडीने दुरुस्तीची नागरिकांची मागणी



प्रतिनिधी २७ जुलै

**खामगाव :** शहरातील नेहमीच गजबजलेला घाटपुरी नाक्याकडे जाणारा रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. या मार्गावरील मंगल कार्यालयाजवळ रस्त्याची चाळण झाली असून, खड्डे पडले आहेत. परिणामी, या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांना तसेच पादचाऱ्यांना दररोज मनस्ताप सहन करावा लागत असून, अपघाताची शक्यता वाढली आहे.

घाटपुरी नाका हा परिसरातील प्रमुख वाहतुकीचा मार्ग मानला जातो. या रस्त्यावरून दररोज हजारो लहान-मोठी वाहने तसेच नागरिकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. असे असूनही दुरवस्थेकडे संबंधित प्रशासकीय विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. रस्त्याच्या मंगल कार्यालयाजवळील खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका वाढला आहे.

### विद्यार्थी व ज्येष्ठांची कसरत!

» या मार्गावरून दररोज शाळकरी मुले, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिक पायी किंवा सायकलने ये-जा करतात. खड्ड्यांमध्ये साचलेल्या पाण्यामुळे आणि बाजूने वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे त्यांच्या अंगावर चिखल उडण्याचे प्रकार नित्याचे झाले आहेत. तसेच खड्ड्यांचा अंदाज न आल्याने ज्येष्ठ नागरिक घसरून पडण्याच्या घटनाही घडत आहेत.

### अपघाताचा धोका!

» खड्ड्यांमध्ये साचलेल्या पाण्याचा अंदाज न आल्यामुळे दुचाकी चालकांचे वाहनांवरील नियंत्रण सुटून लहान-मोठे अपघात घडत आहेत. तसेच गढूळ पाण्यामुळे पादचाऱ्यांच्या अंगावर चिखल उडण्याचे प्रकारही वारंवार घडत आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी या खड्ड्यांमुळे अधिक धोका निर्माण होतो. नागरिक, वाहनधारकांनी या समस्येबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

# आषाढी एकादशी व कारगिल विजय दिवस फराळ फळ बिस्कीट वाटप एकनिष्ठाचा उपक्रम

प्रतिनिधी २७ जुलै



**खामगाव :** आषाढी एकादशी व कारगिल विजय दिनाचे औचित्य साधून एकनिष्ठा गौ सेवा रक्तसेवा फाउंडेशनच्या वतीने खामगाव येथील सामान्य रुग्णालयात रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी सलग दोन दिवस सेवा उपक्रम राबविण्यात आला. आषाढी एकादशीला फराळी चिवडा वाटप दि. २५ जुलै २०२६ शुक्रवार रोजी आषाढी एकादशीनिमित्त सामान्य रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांना फराळी चिवड्याचे ५०० पाकिटे वाटप करण्यात आली. उपवास असलेल्या नागरिकांना याचा मोठा दिलासा मिळाला. कारगिल विजय दिवस केळी व बिस्कीट वाटप दि. २६ जुलै २०२६ शनिवार रोजी कारगिल विजय दिवस देशभक्तिच्या भावने साजरा करण्यात आला. यावेळी शहीद जवानांना श्रद्धांजली वाहून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना केळी व पारले-जी बिस्कीट वाटप करण्यात आले. वाढदिवसही साजरा केला सेवेतून हा संपूर्ण उपक्रम सुरजभैय्या यादव यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आला. तसेच फाउंडेशनचे तालुका उपसचिन विक्की इंगळे यांनी त्यांची कन्या कु. सवी विक्की इंगळे वय ३ वर्ष या चिमुकलीच्या वाढदिवसानिमित्त कोणताही व्यर्थ खर्च न करता, सामाजिक बांधिलकी जपत सामान्य रुग्णालयातील गरजू रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना केळी व बिस्कीट वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे रुग्णालयात सेवाभावाचे आणि देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. एकनिष्ठा गौ सेवा रक्तसेवा फाउंडेशनच्या या सामाजिक उपक्रमाचे नागरिक व रुग्णांच्या नातेवाईकांकडून विशेष कौतुक करण्यात आले. या दोन दिवसीय उपक्रमात प्रमुख उपस्थित सुरजभैय्या यादव, रविंद्र इंगळे, विक्की इंगळे, शेख सलीम शेख फरीद, अविनाश घोडके, रुपेश कलंत्री, संतोष आटोळे, सुरज लोंढे, भारत पंजवाणी, गौरव कवटेकर, गोपाल इटीवाले, विनोद कळसकर, अमोल ताठे, शंकर कोळसे, अक्षय भोजने, पंकज नसुर्डे, आश्विन इंगळे, धम्मपाल गवई, कैलास इंगळे, बाळू इंगळे, राजू इंगळे,१ सेट, शैलेश इंगळे, दिलीप इंगळे, अतुल इंगळे, प्रदीप इंगळे, संदेश इंगळे, अनुप लोखंडे, सचिन इंगळे, सोहम ठोसरे, रुद्र ठोसरे, अमर तेलंग, नरेश मसनेवार, शिवा वनारे आदि लोकांनी सहभाग घेतला होता कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुरज लोंढे हे होते तसेच सूत्रसंचालन रुपेश कलंत्री यांनी केले तर आभार अविनाश घोडके यांनी मानले.

# पूर्ववैमनस्यातून शेगावात कुऱ्हाडीने हल्ला; दोघे गंभीर!

## गावठी पिस्तूल दाखवल्याची चर्चाः पोलिसांकडून दुजोरा नाही!

प्रतिनिधी २७ जुलै

**खामगाव :** शहरातील एमईसीबी चौकात रविवारी सायंकाळी पूर्ववैमनस्यातून दोघांवर कुऱ्हाडीने हल्ला करण्यात आल्याची घटना घडली. या हल्ल्यात दोघे गंभीर जखमी झाले असून, त्यांना पुढील उपचारासाठी अकोल्यातील सर्वोपचार रुग्णालयात हलविण्यात आले. दरम्यान, हल्लेखोरांनी गावठी पिस्तूल दाखवल्याची चर्चा शहरात सुरू होती; मात्र याबाबत पोलिसांकडून अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. मिळालेल्या आळसना माहितीनुसार, रोडवरील एमईसीबी चौकातून दोघे दुचाकीवरून जात असताना आधीपासून कुऱ्हाडी घेऊन थांबलेल्या दोघांनी त्यांना अडवून अचानक हल्ला केला. कुऱ्हाडीचे वार झाल्याने दोघेही गंभीर जखमी झाले. प्रत्यक्षदर्शीकडून मिळालेल्या माहितीनुसार, मारहाणीदरम्यान एका हल्लेखोराने गावठी पिस्तूल काढून जखमींकडे रोखल्याची चर्चा होती. तथापि, या बाबीला अधिकृत पुष्टी मिळालेली नाही. घटनेची माहिती मिळताच शेगाव पोलिस ठाण्याचे ठाणेदार निमीष मेहत्रे सहकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. जखमींना तातडीने शहरातील सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर त्यांची प्रकृती गंभीर असल्याने अकोला येथील सर्वोपचार रुग्णालयात रेफर करण्यात आले. या घटनेत पवन लांजुळकर आणि शिवा तांदळे हे जखमी झाल्याची माहिती असून, घटनेनंतर काही काळ सामान्य रुग्णालय परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. उशिरापर्यंत शेगाव पोलिसांची कारवाई सुरू होती. हल्ल्याचे नेमके कारण आणि आरोपींचा शोध घेण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे. वृत्तलिहेपर्यंत गुन्हा दाखल झाला नव्हता.

# जिल्ह्यातील एकमेव ए.एन.एस. इन्फोव्हॅली आयटीआयची केंद्राच्या योजनेसाठी निवड

प्रतिनिधी २७ जुलै

**खामगाव :** भारत सरकारच्या कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयांतर्गत प्रशिक्षण महासंचालनालय (DGT) राबवत असलेल्या महत्त्वाकांक्षी रोजगारासह प्रशिक्षण (Apprenticeship)* योजनेसाठी खामगाव येथील ए.एन.एस. इन्फोव्हॅली आयटीआय कॉलेज ची निवड झाली आहे. बुलडाणा जिल्ह्यात या योजनेसाठी निवड झालेले हे एकमेव आयटीआय ठरले असून विद्यार्थ्यांसाठी ही मोठी संधी मानली जात आहे. या योजनेअंतर्गत इलेक्ट्रिशियन, वायरमन, फिटर आणि वेल्डर या चार ट्रेडमधील प्रत्येकी २० अशा एकूण ८० प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षणासोबतच नोकरीची संधी उपलब्ध होणार आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना धूत ट्रान्समिशन, संभाजीनगर येथे प्रत्यक्ष औद्योगिक वातावरणात कौशल्याधारित प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षणाच्या कालावधीत प्रशिक्षणार्थ्यांना कंपनीकडून दरमहा १५ हजार मानधन तसेच इतर सुविधा दिल्या जाणार आहेत. आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या कौशल्यात भर पडणार असून देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधीही उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. महत्त्वाचे म्हणजे, शिक्षण घेत असतानाच उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव आणि आर्थिक मानधन मिळणार असल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास आणि करिअर घडविण्यास ही योजना उपयुक्त ठरणार आहे.

# समृद्धी महामार्गावर दोन तासांत दोन अपघात; एक गंभीर, चौघे जखमी

प्रतिनिधी २७ जुलै

**सिंदखेडराजा :** समृद्धी महामार्गावरील नागपूर कॉरिडॉरमध्ये रविवारी (दि. २६) पहाटे अवघ्या दोन तासांच्या अंतराने दोन अपघात घडले. पहिल्या साखळी अपघातात एक जण गंभीर, तर चार जण किरकोळ जखमी झाले. त्यानंतर मालवाहू वाहनाचे टायर फुटून वाहन पलटले; मात्र या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. रविवारी पहाटे सुमारे ३.५५ वाजता चॅनल क्रमांक ३३६.२०० (नागपूर कॉरिडॉर) येथे मुंबईहून नागपूरकडे जाणारे प्रवासी वाहन (एमएच १४ एलएक्स १३२०) अज्ञात ट्रकच्या मागे जात होते. यावेळी ट्रकचालकाने अचानक लेन बदलल्याने प्रवासी वाहन ट्रकच्या मागील बाजूस धडकले. अपघातानंतर ट्रकचालक वाहन न थांबवता पसार झाला. त्यानंतर काही क्षणांतच मागून भरधाव येणाऱ्या कारने (एमएच ४३ सीयू ११६१) अपघातग्रस्त वाहनाला जोरदार धडक दिल्याने तिन्ही वाहनांचा साखळी अपघात झाला. या अपघातात प्रवासी वाहनातील विनोद नागोश (४७) आणि खलील खान (५५) हे किरकोळ जखमी झाले. कारमधील मनीष पांडे गंभीर जखमी झाले, तर प्रणव मिश्रा (४४) आणि मोहित मिश्रा यांना किरकोळ दुखापत झाली.

**रुग्णवाहिका व वैद्यकीय पथक दाखल**

सर्व जखमींना तातडीने सिंदखेडराजा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच समृद्धी महामार्ग उपकेंद्राचे पोलीस, एमएसएफचे जवान, १०८ रुग्णवाहिका आणि वैद्यकीय पथक घटनास्थळी दाखल झाले. क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली. त्यामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ प्रभावित झालीहोती. यानंतर सकाळी सुमारे ६ वाजता, पहिल्या अपघातस्थळापासून काही अंतरावर पंढरपूरहून नागपूरकडे जाणाऱ्या बोलेरो जीपचे (एमएच ४९ बीआर १४३२) टायर फुटल्याने वाहन पलटले. या अपघातात जीपचे मोठे नुकसान झाले; मात्र वाहनातील सर्व प्रवासी सुखरूप बचावल्याची माहिती पोलिसांनी दिली. अज्ञात ट्रकचालकाचा पोलिस शोध घेत आहेत.

# दुसऱ्या दिवशीही वनविभागाची कारवाई सव्वा पाच लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी २७ जुलै

**खामगाव :** तालुक्यात व परिसरात होत असलेली अवैध वृक्षतोड आणि लाकडांची तस्करी रोखण्यासाठी वनविभागाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. वनविभागाच्या पथकाने सलग दुसऱ्या दिवशी, म्हणजेच २५ जुलै रोजी अवैध लाकूड वाहतुकीविरोधात मोठी कारवाई करत खामगाव-अकोला मार्गावर लाकडाने भरलेला एक ट्रक पकडला. या कारवाईत ट्रकासह सुमारे सव्वा पाच लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे वनविभागाच्या - पथकाने खामगाव-अकोला महामार्गावरील लांजुड फाट्याजवळ सापळा रचला होता. ट्रक क्रमांक एमपी ०९ एसजी ५५७७ हा ट्रक येताच पथकाने त्याचा पाठलाग करून ट्रक थांबवला. तपासणी केली असता त्यात कोणत्याही वैध परवान्याशिवाय मोठ्या प्रमाणावर लाकूड वाहून नेले जात असल्याचे उघडकीस आले. पथकाने तात्काळ ट्रक जप्त करून चालक ईरफान खान नसिर खान रा. बऱ्हाणपुर याला मुद्देमालसह ताब्यात घेतले आहे. जप्त करण्यात आलेला मुद्देमाल नेमका कुठून आणला गेला आणि कुठे नेला जात होता, या तस्करीमागे मोठे रॅकेट आहे का, याचा सखोल तपास वनविभागाचे पथक करत आहे. अवैध वृक्षतोड करणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा वनविभागाने दिला आहे. सदर कारवाई उपवनसंरक्षक जमीर शेख बुलढाणा यांच्या मार्गदर्शनात व्ही. एम. काकडे बुलढाणा, एस.पी. पवार वनपरिक्षेत्र अधिकारी, ए. पी. श्रीनाथ वनपाल, एस. एस. तायडे वनरक्षक, शिवाजी उमाळे, मिलींद इंगळे यांनी केली.

# खांडवीत 2 घरांमध्ये चोरी; 1 3 लाखांचा ऐवज लंपास अज्ञाताविरुध्द गुन्हा

प्रतिनिधी २७ जुलै

**जळगाव जामोद :** तालुक्यातील खांडवी येथे अज्ञात चोरट्यांनी २ घरांमध्ये चोरी करून रोख रक्कम व सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह एकूण १३ लाख ३५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी जळगाव जामोद पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३१ (४), ३०५ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस सुत्रांकडून माहितीनुसार, चंद्रकांत दिलीप कोल्हे वय ३४, रा. खांडवी यांच्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश केला. त्यानंतर गावातील रहिवासी आदिनाथ बावस्कार यांच्या घराची कडी उघडून तेथेही चोरी केली. ही घटना २५ जुलै रोजी रात्री ११.३० ते २६ जुलै रोजी पहाटे ५.३० वाजेदरम्यान घडली. चोरट्यांनी दोन्ही घरांतील कपाटातून २ लाख २० हजार रुपये रोख तसेच सुमारे ११ लाख १५ हजार रुपये किमतीचे जुने वापरातील सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण १३ लाख ३५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. फिर्यादी चंद्रकांत कोल्हे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून, पो. उप. अमोल पंडित हे पुढील तपास करीत आहेत. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी, पोलिस निरीक्षक सचिन बागुल, सहाय्यक पोलिस निरीक्षक नागेश मोहोड व पोलिस पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. अज्ञात आरोपी आणि चोरीस गेलेल्या मुद्देमालाचा शोध सुरू आहे.

# जुन्या वादातून दुकानात घुसून मारहाण; तिघांविरुद्ध गुन्हा

## सात हजार रुपयांची रोकड लंपास केल्याचा आरोप

प्रतिनिधी २७ जुलै

**खामगाव:** शहरातील मेन रोड परिसरात जुन्या वादातून तिघांनी दुकानात घुसून युवकाला मारहाण करत सुमारे ७ हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना घडली. या प्रकरणी खामगाव शहर पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संतोष हरिहर घ्यार (वय २५, रा. संतविहार, खामगाव) हा २५ जुलै रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास आपल्या लहान भावासह दुकानासमोर बसलेला होता. त्यावेळी आरोपी शिवानी विलास देशमुख (वय १९) ही तेथे आली. जुन्या वादाच्या कारणावरून तिने संतोष घ्यार याला शिवीगाळ केली. त्यानंतर शिवानी हिने दीपक जांभे (वय ३५) व विक्की पारधी (वय ३४, सर्व रा. महाकाल चौक, खामगाव) यांना तेथे बोलावून घेतले. तिघांनी मिळून दुकानात घुसून संतोष घ्यार याला शिवीगाळ करत चापटाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी फिर्यादीचा भाऊ सोडविण्यासाठी आला असता, आरोपींनी त्यालाही मारहाण करत केस ओढून ढकलाढकली केली. दरम्यान, आरोपींपैकी एकाने दुकानाच्या गल्ल्यातील सुमारे ७हजार रुपयांची रोकड काढून घेतली व फिर्यादीस जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी फिर्यादी संतोष घ्यार यांच्या तक्रारीवरून खामगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कायदे विषयक जागृती कार्यशाळा

प्रतिनिधी २७ जुलै

**खामगाव :** गो. से. विज्ञान, कला आणि वाणिज्य महाविद्यालय, खामगाव येथील अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती (POSH Act, 2013 अन्वये गठीत) आणि तालुका विधी सेवा समिती, खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने "कायदे विषयक जागृती कार्यशाळेचे" नुकतेच आयोजन करण्यात आले. जिल्हा न्यायाधीश बी. बी. शेळके साहेब आणि त्यांची टीम अॅड.एन.एस.नारखेडे, अॅड प्रशांत दाभाडे, अॅड. रितेश निगम यांनी विविध कायद्यांच्या विषयी सविस्तर माहिती दिली.. POSH Act म्हणजेच लैंगिक छळ प्रतिबंध मनाई आणि निवारण कायदा, POSCO लैंगिक गुन्ह्यांपासून १८ वर्षाखालील मुलांचे संरक्षण कायदा, या सर्वांबाबत सखोल माहिती दिली. एन एस नारखेडे यांनी NALASA राष्ट्रीय कायदेशीर सेवा प्राधिकरण याची माहिती दिली.

# उशिराची तणनाशक फवारणी पिकांसाठी घातक !

प्रतिनिधी २७ जुलै

**खामगाव:** अलीकडील काळात पावसाने खंड दिल्यामुळे रखडलेली तणनाशक फवारणी आता वेगाने सुरू झाली आहे. विशेषतः सोयाबीन पिकात तण नियंत्रणासाठी शेतकरी मोठ्या प्रमाणावर फवारणी करताना दिसत आहेत. पावसाच्या खंडामुळे तणनाशक फवारणी न झाल्यामुळे तणांची वाढ झपाट्याने झाल्याने अनेक शेतकऱ्यांना उशिरा फवारणी करण्याची वेळ येत आहे; मात्र ही फवारणी योग्य वेळेत न केल्यास पिकांसाठी ती नुकसानकारक ठरू शकते, असा इशारा कृषी तज्ज्ञांनी दिला आहे. सध्या अनेक शेतकऱ्यांच्या पेरणीला २५ ते ३० दिवस उलटून गेले आहेत. या कालावधीत तण मोठ्या प्रमाणात वाढल्याने शेतकरी तणनाशकांचा वापर करत आहेत; परंतु या टप्प्यावर फवारणी केल्यास सोयाबीन पिकाच्या वाढीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता अधिक असते. उशिरा फवारणीमुळे पिकांची वाढ खुंटते, पाने पिवळी पडतात किंवा करपतात.

## चुकीच्या वेळेमुळे सोयाबीन उत्पादन घटणार!



### 'उशीर झाल्यास कोळपणी किंवा खुरपणी करावी!'

» शेतकऱ्यांनी फवारणीपूर्वी जमिनीत पुरेसा ओलावा असल्याची खात्री करणे आवश्यक आहे. कोरड्या जमिनीत फवारणी केल्यास औषधाचा परिणाम कमी होतो. तसेच, तणनाशकाचा डोस कृषी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसारच वापरावा. उशीर झाल्यास रासायनिक फवारणीऐवजी कोळपणी किंवा खुरपणीसारख्या पारंपरिक उपायांचा अवलंब करणे अधिक सुरक्षित आणि फायदेशीर ठरते.

# मलकापूर तालुका एफपीसी कडून शेतकऱ्यांसाठी आधुनिक शेती उपक्रम

## उत्पादन खर्च कमी करून नफा वाढविण्यावर भर

प्रतिनिधी २७ जुलै



**मलकापुर :** शेतकरी बांधवांचा शेतीवरील उत्पादन खर्च कमी करून अधिकाधिक नफा मिळवून देण्यासाठी मलकापूर तालुका शेतकरी उत्पादक कंपनी (एफपीसी) मार्फत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत शेतकऱ्यांना मोफत तांत्रिक मार्गदर्शन, कृत्रिम बुद्धिमत्ता (रद्ब) आधारित पीक सल्ला तसेच उत्पादित शेतमालासाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा संकल्प जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे ,तालुका कृषी अधिकारी ललित सूर्यवंशी व सर्व कृषी विभागाचे अधिकारी यांच्या मार्गदर्शनात कंपनीने केला आहे. या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात वाघोळा येथील ५० ,जांबुळधाबा येथील २५ ,हरणखेड येथील २५ , शेतकरी बांधवांच्या शेतावर प्रत्यक्ष भेट देऊन क्रॉप अॅडव्हायझरमार्फत संपूर्ण पीक व्यवस्थापनाचे मोफत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. पीकनिहाय खत व्यवस्थापन, रोग व किड नियंत्रण, सिंचन नियोजन, उत्पादनवाढीच्या आधुनिक पद्धती याबाबत तज्ज्ञांकडून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेतात सल्ला दिला जाणार आहे अशी माहिती व्यवस्थापकीय संचालक प्रशांत तळोले यांनी आयोजित शेतकरी मेळाव्यात दिली. याशिवाय कृत्रिम बुद्धिमत्ता (रद्ब) च्या माध्यमातून सर्व शेतकरी बांधवांना वेळोवेळी अचूक व वैज्ञानिक शेतीविषयक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे पीक व्यवस्थापनातील निर्णय अधिक परिणामकारक ठरून उत्पादन खर्चात बचत आणि उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल. तसेच शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या कृषी मालाला योग्य दर व व्यापक बाजारपेठ मिळावी यासाठी मलकापूर तालुका शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून शेतमालाची विक्री व विपणन व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे परिसरातील शेतकऱ्यांना वैज्ञानिक शेती, कमी उत्पादन खर्च, दर्जेदार उत्पादन आणि शाश्वत बाजारपेठ यांचा लाभ मिळणार असल्याने शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे. या कार्यक्रमासाठी वाघोळा,जांबुळधाबा, हरणखेड येथील शेतकरी बंधू उपस्थित होते. याप्रसंगी बाजार समितीचे उपसभापती नागोजी राणे ,जांबुळधाबा येथील चंद्रकांत चव्हाण व कंपनीचे अध्यक्ष सौ .ज्योत्सना तळोले, प्रमुख म्हणून उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी संचालक विलास खर्चे ,संजय फिरके, विवेक हिवरे, निलेश तांदुळकर ,विजय कळमकर आदींनी प्रयत्न केले. या उपक्रमामुळे परिसरातील शेतकऱ्यांना वैज्ञानिक शेती, कमी उत्पादन खर्च, दर्जेदार उत्पादन आणि शाश्वत बाजारपेठ यांचा लाभ मिळणार असल्याने शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
सोमवार, दि. २७ जुलै २०२६ Web. http://epaper.citynewssuperfast.com



# काटेपूर्णाच्या पाणीसाठ्यात अपेक्षित वाढ नाही



## अवघा 17.24% जलसाठा नागरिकांच्या चिंतेत भर

प्रतिनिधी २७ जुलै

**अकोला:** बार्शीटाकळी तालुक्यासह अकोला जिल्ह्यासाठी चिंतेची बातमी आहे. अर्धा पावसाळा संपत आला, तरी काटेपूर्णा धरणातील पाणीसाठ्यात अपेक्षित वाढ झालेली नाही. धरणात सध्या अवघा 17.24 टक्के जलसाठा असून शेतकरी आणि नागरिकांची चिंता वाढली आहे.

अर्धा पावसाळा संपत आला असतानाही बार्शीटाकळी तालुक्यातील महत्त्वाच्या काटेपूर्ण धरणातील पाणीसाठ्यात अपेक्षित वाढ झालेली नाही. सध्या धरणात केवळ 17.24 टक्के जलसाठा असून परिस्थिती चिंताजनक बनली आहे.

या धरणावर अकोला, बार्शीटाकळी तसेच परिसरातील अनेक गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अवलंबून आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांनाही सिंचनासाठी या धरणाकडून मोठ्या अपेक्षा आहेत.

मात्र, कमी जलसाठ्यामुळे आगामी काळात पिण्याच्या पाण्याबरोबरच शेतीसाठीही पाण्याची टंचाई निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, धरण प्रकल्पाची एकूण क्षमता जवळपास 43.96 टक्के असली, तरी नागरिकांना पिण्याचे पाणी पोहोचविणाऱ्या पाइपलाइन योजना आणि शेतकऱ्यांसाठीचे डावे-उजवे कालवे अद्याप पूर्णत्वास गेलेले नाहीत.

त्यामुळे धरणात पाणी असले, तरी त्याचा अपेक्षित लाभ अनेक गावांपर्यंत पोहोचत नसल्याचे वास्तव समोर आले आहे.आता उर्वरित पावसाळ्यात दमदार पाऊस होऊन काटेपूर्ण धरणातील जलसाठा वाढतो का, याकडे अकोला आणि बार्शीटाकळी तालुक्यातील नागरिकांसह शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# टिटंबा आश्रमशाळेतिल सर्व 70 विद्यार्थ्यांची प्रकृती बरी

## अफवांवर विश्वास न ठेवण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

प्रतिनिधी २७ जुलै

**अमरावती:** धारणी तालुक्यातील टिटंबा येथील शासकीय निवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना २५ जुलै रोजी सायंकाळी अन्नातून विषबाधा झाल्याची लक्षणे आढळून आली आहे.

आता मात्र तालुक्यातील इतर शाळांमधील काही विद्यार्थी घाबरून पोटदुखी आणि अतिसार झाल्याचे सांगत आहे.विद्यार्थ्यांची तपासणी केली असता त्यांना कोणताही आजार अथवा अन्नातून विषबाधा झालेली नाही. याप्रकरणी जिल्हा प्रशासन पूर्ण लक्ष ठेवून असून पालक आणि विद्यार्थ्यांनी घाबरून अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

टिटंबा येथील प्रकारानंतर इतर शाळांमधील विद्यार्थीही आरोग्याच्या तक्रारी करीत आहेत. मात्र या विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केल्यानंतर त्यांना कोणताही आजार झालेला नसल्याचे स्पष्ट झाले. कालच्या घटनेमुळे विद्यार्थी घाबरून आरोग्यविषयक तक्रारी करीत आहे.

तसेच अफवा पसरल्यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र विद्यार्थी आणि पालकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. संपूर्ण परिस्थिती नियंत्रणात असल्याने घाबरून जाऊ नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

दि. २५ जुलै रोजी जेवण केल्यानंतर सुमारे ७० विद्यार्थ्यांना उलट्या, मळमळ आणि चक्कर येणे असा त्रास सुरू झाला. या घटनेची माहिती मिळताच प्रशासनाने तातडीने सूत्रे हलवून सर्व विद्यार्थ्यांना उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले आहे. सध्या सर्व विद्यार्थ्यांची तब्येत पूर्णपणे बरी असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, उपजिल्हा रुग्णालय अधीक्षक आणि तालुका आरोग्य अधिकारी यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. तत्काळ रुग्णवाहिकांची व्यवस्था करून बाधित ७० विद्यार्थ्यांना धारणी येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तेथे त्यांच्यावर तातडीने वैद्यकीय उपचार सुरू करण्यात आले आहेत. यातील सर्व विद्यार्थी पूर्णपणे बरे झाले आहे.

खबरदारीचा उपाय म्हणून टिटंबा येथील शासकीय आश्रमशाळेत उर्वरित विद्यार्थ्यांच्या देखरेखीसाठी एक वैद्यकीय पथक, पुरेसा औषधसाठा आणि पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# डाबकी रोडवर कोसळले भलेमोठे कडुलिंबाचे झाड

प्रतिनिधी २७ जुलै



**अकोला:** शहरातील डाबकी रोडवरील श्रीवास्तव चौक येथे रविवारी अचानक एक भलेमोठे कडुलिंबाचे झाड रस्त्यावर कोसळल्याने काही काळ वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. घटनेची माहिती मिळताच नगरसेविका मंजुषा ताई शेळके यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मनपा, महावितरण आणि पोलिस प्रशासनाच्या मदतीने झाड हटवून वाहतूक सुरळीत करण्याची कार्यवाही केली.

अकोला शहरातील वर्दळीच्या डाबकी रोडवरील श्रीवास्तव चौक येथे रविवारी अचानक एक भलेमोठे कडुलिंबाचे झाड रस्त्यावर कोसळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. झाड रस्त्याच्या मध्यभागी पडल्याने काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. मात्र सुदैवाने यावेळी कोणतीही जीवितहानी अथवा मोठी दुर्घटना घडली नाही आणि संभाव्य अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच नगरसेविका मंजुषा ताई शेळके यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांच्या सूचनेनुसार महापालिका, महावितरण आणि पोलि प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना घटनास्थळी पाचारण करण्यात आले. मनपा कर्मचारी, पोलिस आणि स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने झाड तातडीने हटविण्यात आले. त्यामुळे काही वेळातच वाहतूक पूर्ववत सुरू करण्यात आली.या तत्पर कारवाईबद्दल स्थानिक नागरिकांनी नगरसेविका मंजुषा ताई शेळके यांचे कौतुक केले.

# बॅग चोरणारा आरोपी जेरबंद

प्रतिनिधी २७ जुलै



**अकोला :** हैदराबाद-जयपूर एक्स्प्रेसने प्रवास करणाऱ्या एका दिव्यांग दाम्पत्याची चोरीला गेलेली बॅग अवघ्या काही तासांत हस्तगत करत आरपीएफ, दमरे आणि जीआरपी, अकोला यांनी सुपरफास्ट कारवाई केली आहे. या कारवाईत सराईत चोराला अटक करून ५,१०० रुपये किमतीचा मुद्देमाल आणि अत्यंत महत्त्वाची मूळ कागदपत्रे फिर्यादीस परत करण्यात आली आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, २५ जुलै रोजी १७०७९ हैदराबाद-जयपूर एक्स्प्रेस वाशीम स्थानकावर आली असता, दमरे आरपीएफचे सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक सलीम खान आणि हवालदार सुनील कुमार हे गस्तीवर होते. त्यावेळी एक व्यक्ती हिरव्या रंगाची संशयास्पद ट्रॉली बॅग घेऊन घाईघाईने खाली उतरताना त्यांना दिसला. आरपीएफच्या पथकाने त्याला थांबवून विचारपूस केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने आपले नाव संदीप बबन वानखडे (वय ३५, रा. वाशीम) असे सांगितले. गेल्या ४ ते ५ वर्षांपासून तो धावत्या ट्रेनमध्ये चोऱ्या आणि खिशाकापूची कामे करत असल्याची कबुली त्याने दिली. तसेच या चोरीमध्ये जळगाव येथील 'फारूक' नावाचा त्याचा साथीदारही सामील असल्याची माहिती त्याने दिली. याच हैदराबाद-जयपूर एक्स्प्रेसने फिर्यादी शीतल पटेल (वय ३१, रा. धमनोद, जि. धार, म.प्र.) या आपले पती विजय पटेल यांच्यासह खंडवा येथे प्रवास करीत होत्या. पहाटे ५.०० वाजेच्या सुमारास अकोला-वाशीम दरम्यान त्यांची ट्रॉली बॅग अज्ञात चोरट्याने लांबवली. अकोला स्थानकाजवळ आपली बॅग चोरीला गेल्याचे त्यांच्या लक्षात आले होते. या बॅगेत शैक्षणिक व नोकरीसंदर्भातील महत्त्वाची कागदपत्रे, कॉस्मेटिक साहित्य व इतर ऐवज होता. फिर्यादीचे पती हे डीआरडीओ मध्ये तंत्रज्ज्ञ पदावर कार्यरत असल्याने ही कागदपत्रे अत्यंत महत्त्वाची होती. या प्रकरणी जीआरपी अकोला पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०५(सी) अन्वये गुन्हा क्र. ०२३२/२०२६ दाखल करण्यात आला आहे. पसार झालेल्या 'फारूक'या सह-आरोपीचा पोलिस सध्या शोध घेत आहेत.

# गतिरोधकाची उंची कमी करण्याची मागणी

**अकोला :** उमरी रेल्वेपुलाजवळील रस्त्यावर उभारण्यात आलेल्या उंच कॉँक्रीटच्या गतिरोधकामुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. गतिरोधकाची उंची अधिक असल्याने दुचाकीस्वारांसह चारचाकी वाहनांनाही वेग कमी करताना अडचणी येत असून, वाहनांचे नुकसान होण्याची शक्यताही निर्माण झाली आहे. तसेच महिला व मुलींच्या गाड्या या गतिरोधकाला अडत असल्याने त्यांचा तोल जाऊन अपघाताची शक्यता आहे. त्यामुळे गतिरोधकाची उंची कमी करण्याची मागणी वाहनधारकांनी केली आहे. गेल्या काही दिवसांपासून या रस्त्याने ये-जा करणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. तो तातडी दुर करावा अशी मागणी आहे.

# पातूर तालुक्यातील घरकुल योजनेत घोळ?




प्रतिनिधी २७ जुलै

**पातूर :** पातूर तालुक्यात प्रधानमंत्री आवास (घरकुल) योजनेच्या अंमलबजावणीत मोठा घोळ असल्याचा आरोप लाभार्थ्यांकडून करण्यात येत आहे. अनेक लाभार्थ्यांनी घरकुलाचे बांधकाम पूर्ण करूनही अनुदानाची रक्कम वेळेवर मिळत नसल्याने त्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. संबंधित कार्यालयाकडून होत असलेल्या दिरंगाईमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.खानापूर येथील एका घरकुल लाभार्थ्याने 2024 मध्ये घरकुलाचे काम पूर्ण केल्याचे सांगितले असून, त्यानंतरही प्रलंबित हप्त्याची रक्कम मिळालेली नाही. गेल्या दोन वर्षांपासून संबंधित कार्यालयाच्या वारंवार फेऱ्या मारूनही केवळ आश्वासने मिळत असल्याचा आरोप लाभार्थ्याने केला आहे.घरकुलाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी अनेक लाभार्थ्यांनी खासगी कर्ज घेतले असून, अनुदानाची रक्कम रखडल्याने कर्जाचे हप्ते भरणे कठीण झाले आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. लाभार्थ्यांची प्रकरणे तत्काळ निकाली काढून प्रलंबित निधी अदा करावा, तसेच घरकुल योजनेतील विलंबाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी स्कूल बस नियमावलीत मोठे बदल

प्रतिनिधी २७ जुलै

**अकोला:** शालेय विद्यार्थ्यांच्या वाहतुकीची सुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने स्कूल बस नियमावलीमध्ये सुधारणा करत 'महाराष्ट्र मोटार व्हिईकल्स (स्कूल बस करिता विनियम), २०२६ पहिली सुधारणा' लागू केली आहे. या नवीन नियमांचे पालन करणे सर्व शाळा व्यवस्थापन आणि वाहन चालकांसाठी बंधनकारक करण्यात आले असून, पुढील तीन महिन्यांत याची पूर्तता न केल्यास वाहनाचा परवाना निलंबित किंवा रद्द केला जाईल, असा इशारा अकोला उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाने दिला आहे. नवीन नियमांनुसार प्रत्येक शाळेमध्ये 'शालेय वाहतूक समिती' स्थापन करावी लागणार आहे. ही समिती आर.टी.ओ.ने निश्चित केलेल्या दरानुसार स्कूल बस आणि व्हॅनचे भाडे तपासणे, पालकांच्या तक्रारींचे निवारण करणे आणि प्रत्येक तिमाहीचा अहवाल जिल्हा शालेय बस सुरक्षितता समितीला सादर करण्याचे काम करेल. स्कूल बस आणि व्हॅनचे भाडेदर प्रति विद्यार्थी प्रति किलोमीटर याप्रमाणे प्रादेशिक परिवहन कार्यालय ठरवणार असून, आकारले जाणारे भाडे निश्चित दरापेक्षा १० टक्केपेक्षा कमी किंवा जास्त नसावे. स्कूल बस किंवा व्हॅनवर नियुक्त केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची (वाहन चालक, महिला व पुरुष परिचर) शाळा व्यवस्थापन किंवा वाहन मालकाकडून लेखी आदेशाद्वारे नेमणूक करणे आवश्यक आहे. तसेच पोलिसांकडून त्यांचे चारित्र्य पडताळणी रिपोर्ट (व्हेरिफिकेशन) आणि शासकीय रुग्णालयातून वैद्यकीय अहवाल घेणे बंधनकारक केले आहे. शाळांना सर्व कर्मचाऱ्यांचे ओळखपत्र, आधार कार्ड, पॅन कार्ड आणि वैयक्तिक कागदपत्रांचा संपूर्ण रेकॉर्ड ठेवावा लागेल.




### सुरक्षेसाठी आधुनिक डिजिटल प्रणाली आणि तंत्रज्ञान बंधनकारक

» विद्यार्थ्यांच्या रिअल टाईम ट्रॅकिंगसाठी आणि सुरक्षिततेसाठी प्रत्येक स्कूल बसमध्ये 'डिजिटल सेफ्टी मॉनिटरिंग सिस्टम' असणे गरजेचे आहे. यामध्ये खालील सुविधांचा समावेश असेल. वाहनांमध्ये CCTV कॅमेरे बसवणे बंधनकारक असून, पालकांसाठी मोबाईल ॲपद्वारे लाईव्ह ट्रॅकिंग आणि डिजिटल हजेरीची सुविधा उपलब्ध करून द्यावी लागेल. CCTV फुटेजचा किमान ३० दिवसांचा बॅकअप ठेवणे शाळा व्यवस्थापन किंवा वाहन मालकावर बंधनकारक राहील, जो आवश्यकतेनुसार आर.टी.ओ. किंवा पोलिसांना द्यावा लागेल. प्रत्येक वाहनात आग प्रतिबंधक यंत्रणा म्हणून AIS-१३५ प्रमाणित सिस्टीम किंवा इंजिन कम्पार्टमेंटमध्ये किमान १ किलोचा 'फायर बॉल' फिक्स करावा लागेल. शिक्षण विभाग आणि परिवहन अधिकारी संयुक्तपणे या वाहनांची नियमित तपासणी करणार असून त्याचा अहवाल जिल्हा समितीला सादर केला जाईल. तीन महिन्यांच्या आत अकोला जिल्ह्यातील सर्व शाळा व्यवस्थापन आणि स्कूल बस/व्हॅन मालकांनी या नियमांची पूर्तता करावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी मोहम्मद समीर मोहम्मद याकूब यांनी केले आहे.

# टीडब्ल्यूसी मान्सून मॅरेथॉन 2026 अकोल्यात उत्साहात पार पडली

## शेकडो अकोलेकरांची उपस्थिती

प्रतिनिधी २७ जुलै



**अकोला:** नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जनजागृती निर्माण करणे आणि सक्रिय जीवनशैलीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने 'टोटल वेलनेस क्लब' (TWC) च्या वतीने आयोजित 'टीडब्ल्यूसी मान्सून मॅरेथॉन २०२६' रविवारी, २६ जुलै रोजी अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीपणे पार पडली. पावसाच्या रिमझिम सरींमध्ये शेकडो अकोलेकरांनी या मॅरेथॉनमध्ये धावण्याचा आनंद घेतला. ही स्पर्धा रविवारी सकाळी ७:३० वाजता डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ स्टेडियम जवळच्या कृषक भवन येथून थाटात सुरू झाली. यामध्ये ५ किलोमीटर आणि १० किलोमीटर अशा दोन मुख्य गटांचा समावेश होता. नवशिक्या धावपटूंपासून ते अनुभवी ॲथलीट्स आणि सर्व वयोगटातील नागरिकांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने भाग घेतला. मॅरेथॉन यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या सर्व सहभागींना अधिकृत 'फिनिशर मेडल' देऊन सन्मानित करण्यात आले. स्पर्धेच्या समाप्तीनंतर सर्व सहभागींसाठी अल्पोपहाराची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.गेल्या १० वर्षांपासून कार्यरत असलेल्या आणि अकोल्यात दोन शाखा असणाऱ्या 'टोटल वेलनेस क्लब'ने (TWC) अकोलेकरांमध्ये ऊर्जा निर्माण केली आहे.

# कोट्यवधींचा निधी, पण कुलूपबंद 'हिरकणी कक्ष'

## महिला-बालविकास विभागाचा निष्काळजी कारभार उघड

प्रतिनिधी २७ जुलै




**अकोला:** महिला व बालविकास विभागाच्या पुढाकारातून आणि जिल्हा नियोजन समिती अकोलाच्या तीन टक्के निधीतून उभारण्यात आलेला नवीन बसस्थानकातील 'हिरकणी कक्ष' सध्या कुलूपबंद आहे. स्तनदा माता आणि लहान बालकांसाठी सुरक्षित व सन्मानजनक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने उभारलेला हा कक्ष प्रत्यक्षात वापरासाठी बंद असल्याने शासनाच्या उद्देशालाच हरताळ फासला जात आहे.

विशेष म्हणजे, हिरकणी कक्ष सार्वजनिक शौचालयाच्या शेजारीच उभारण्यात आला आहे. महिलांच्या आरोग्य, स्वच्छता आणि गोपनीयतेच्या दृष्टीने ही जागा योग्य होती का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. एका बाजूला महिला सन्मानाच्या घोषणा केल्या जात असताना दुसऱ्या बाजूला प्रत्यक्षात सुविधा कुलूपबंद असल्याचे चित्र दिसत आहे. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून उभारण्यात आलेल्या या सुविधेची नियमित देखभाल, संचालन आणि जबाबदारी नेमकी कोणाची, हा देखील प्रश्न निर्माण झाला आहे. कक्ष बंद असल्याने प्रवास करणाऱ्या स्तनदा मातांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असून, शासनाच्या निधीचा उपयोग नेमका कुठे झाला, याची चौकशी करण्याची मागणी होत आहे. आता महिला व बालविकास विभाग, जिल्हा प्रशासन आणि संबंधित यंत्रणा या गंभीर बाबीची दखल घेऊन हिरकणी कक्ष तातडीने सुरू करणार का, की हा कक्ष केवळ उद्घाटनापुरताच मर्यादित राहणार, याकडे अकोलेकरांचे लक्ष आहे.

# मोठ्या गणेशमूर्तींना यंदा सर्वाधिक मागणी

## शाडूच्या पर्यावरणपूरक मूर्तींची क्रेझ वाढली

प्रतिनिधी २७ जुलै

**अकोला:** गणेशोत्सव नजीक येऊन ठेपला असून अकोल्यातील गणेशमूर्ती बाजारात आता चैतन्याचे वातावरण पाहायला मिळत आहे. मोठ्या गणेशमूर्तींना यंदा विशेष मागणी असून पर्यावरणपूरक शाडूच्या मूर्तींचीही विक्री जोमात सुरू असल्याची माहिती अकोल्याचे प्रसिद्ध मूर्तिकार शिवा मोकालकर यांनी दिली आहे.गणेशोत्सव जवळ येताच अकोल्यातील गणेशमूर्ती बाजार पूर्णपणे सज्ज झाला आहे. यंदा लहान मूर्तींपेक्षा मोठ्या गणेशमूर्तींना भाविकांची सर्वाधिक पसंती मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्याचबरोबर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या शाडूच्या पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची मागणीही यंदा मोठ्या प्रमाणात वाढली आहे.



अकोल्याचे प्रसिद्ध मूर्तिकार शिवा मोकळकर यांनी सांगितले की, मूर्ती तयार करण्याचे काम मे महिन्यापासूनच सुरू केले जाते. प्रत्येक मूर्ती अत्यंत बारकाईने आणि आकर्षक स्वरूपात साकारली जाते. कच्च्या मालाच्या वाढत्या किंमतींचा मूर्ती व्यवसायावर मोठा परिणाम झाला असला, तरीही गणेशभक्तांचा उत्साह कायम असून मोठ्या गणेशमूर्तींची विक्री सध्या जोमात सुरू आहे. लहान मूर्तींपासून ते भव्य-दिव्य गणेशमूर्तींपर्यंत प्रत्येक प्रकारच्या मूर्तींना बाजारात मागणी आहे आणि ही मागणी दरवर्षी वाढतच असल्याचे शिवा मोकळकर यांनी सांगितले.

# वृक्षांचा वाढदिवस साजरा करून पर्यावरण संवर्धनाचा नवा संकल्प

**अकोला :** वृक्षारोपण करूनच पर्यावरण संवर्धन होत नाही, तर त्यांचे जतन आणि संगोपन हीच खरी जबाबदारी असल्याचा संदेश देत युवा लोक चळवळ, महाराष्ट्र राज्य आणि युवापर्व ग्रामविकास फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'वृक्षांचा वाढदिवस सोहळा-२०२६' हा अभिनव उपक्रम शुक्रवार, ३१ जुलै रोजी सकाळी ११ वाजता आलेगाव येथे आयोजित करण्यात आला आहे . झाडांची लागवड तसेच संवर्धन व्हावे या अनुषंगाने युवापर्व ग्रामविकास फाउंडेशनचे कार्यकर्ते चळवळीला वेग देत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135